


# गांधीजी

मराठी

जुगतराम दवे

# गांधीजी

(मराठी)

**जुगतराम दवे**

पहिली आवृत्ति, जुलै १९९६

ISBN: 978-81-7229-168-6

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org

Website : www.navajivantrust.org

# प्रकाशकाचे निवेदन

गूजरात विद्यापीठतर्फे दर वर्षी गांधी जयंतीच्या दिवशी 'गांधी जीवन दर्शन'विषयक परीक्षा घेतली जाते. पाच ते सात इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या या परीक्षेत कुदसिया जैदी यांचे 'गांधीबापू' हे पुस्तक सुरुवातीपासून पाठ्यपुस्तक म्हणून चालू होते.

या वर्षापासून या पुस्तकाबरोबरच गांधीजींच्या जीवनातील ठळक प्रसंगांचे चित्रण केलेले श्री जुगतराम दवे यांचे 'गांधीजी' हे पुस्तकपण पाठ्यपुस्तक म्हणून ठेवायचे नक्की केले आहे.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती गुजरातीतून १९२९ ला प्रसिद्ध झाली होती. आजपर्यंत गुजरातीत लाखाहून अधिक पुस्तके विकली गेली आहेत. सदर पुस्तक म्हणजे याच पुस्तकाची सवलतीच्या दरातील खास आवृत्ती आहे. हेच पुस्तक आज आम्ही मराठीतून प्रसिद्ध करीत आहोत.

परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी गांधीजींचे जीवन आणि त्यांचे कार्य व्यक्त करणाऱ्या कविता मुखोद्गत कराव्यात असे वाटल्याने या पुस्तकात पाच कविता पुस्तकाच्या शेवटी दिल्या आहेत.

परीक्षेसाठी सवलतीच्या दरात असणारी ही आवृत्ती सामान्य वाचकालाही त्याच किंमतीत मिळेल.

ता. ११-७-१९९६

# अनुक्रमणिका


१. कुठले ?
२. जात
३. पुतळीबाई
४. बा (आई)
५. परीक्षा
६. सत्य
७. प्रल्हाद व हरिश्चंद्र
८. वैष्णव
९. चरखा
१०. गांधीजी कसे रहात होते ?
११. सत्याग्रहीची दिनचर्या
१२. मौनवार
१३. गांधीजींची वैशिष्ट्ये
१४. आश्रम – १
१५. आश्रम – २
१६. नोकर
१७. ह्या काठी गंगा आणि त्याकाठी यमुना
१८. बाळ-काठी
१९. पोशाकाचा इतिहास
२०. खादी
२१. खादीची टोपी
२२. सफेद टोपी
२३. सफेद टोपी जिवंत राहिली
२४. गांधी टोपी
२५. एकटी पैरण
२६. भाषांचे ज्ञान
२७. आहारांचे प्रयोग
२८. नैसर्गिक उपचार
२९. दरिद्रीनारायणाचे दर्शन
३०. पंचा
३१. डबा घर-डबा आश्रम
३२. जेल-महाल
३३. तीन प्रतिज्ञा
३४. मजूर बॅरिस्टर
३५. हात पकडून उतरविले
३६. घोडागाडीची व्यथा
३७. धक्का
३८. मित्राच्या हातचा मार
३९. मीर आलम भक्त झाला
४०. भयंकर तुफान
४१. आपल्या पापाचे फळ
४२. हरिजन पहिला
४३. आश्रमात हरिजन
४४. दोन ऐतिहासिक कूच
४५. राष्ट्रीय उपवास
४६. प्रेमाचे उपवास
४७. मोठा उपवास
४८. स्वराज्य
४९. इंग्रजांना
५०. प्रेम
५१. गांधीजींची अहिंसा
५२. आत्मबळ

**कविता**

१. गांधीस्तोत्र
२. बापू केरुं नाम
३. अमारो देश
४. गांधी गुजराते उतर्या
५. गांधीने शरणे आवो रे

## १. कुठले?

गांधीजींचे गाव कुठले ?

पोरबंदर पटकन म्हणेल, “मी, मी, माझ्या येथे त्यांनी जन्म धेतला होता ।“

समुद्रायलीकडे फिनिक्स व टॉल्सटॉय आश्रम बोलत राहील, “खरा जन्म त्यांनी आमच्या येथे धेतला हे कां विसरतां ?”

अहमदाबाद म्हणेल, “त्यांनी आश्रम तर माझ्या साबरमती किनाऱ्यावर बाधळा होता ना?”

पुणे स्वतःचा अधिकार गाजवेल, “त्यांना तुरुंगवास तर माझ्या येरवडा जेलनेच दिला होता हे विसरू नका.”

बिहारचे शेतकरी म्हणतील, “तुम्ही काहीही म्हणा, पण गांधीजी तर आमचेच. आमच्या निळच्या शेतांत ते किती फिरले होते त्याची तुम्हांला काय कल्पना ?”

तेव्हा तर पंजाब गर्जना करीत राहील, ''गांधीजींना जागृत करणारा माझा जलियावाला बागच होता. त्याबद्दल कोण नकार देऊ शकेल?”

कलकत्ता म्हणेल, “पण असहकारचा शंख तर त्यांनी माझ्या भूमीत फुंकला नां ?”

मुंबई म्हणेल, “पण सत्याग्रह सुरू करण्यास येथेच आले होते नां ?”

बारडोली म्हणेल, “मोठ्या नगाऱ्यात माझी पिपाणी कोणी ऐकेल कां? गांधीजींनी रणक्षेत्र तर माझेच स्वीकारले होते.”

दिल्ली गांधीजींना स्वतःचेच समजते, कारण उपवासाचे पवित्र २१ दिवस गांधीजींनी तेथेच घालविले. बेळगावला स्वतःचा हक्क सर्वाहून अधिक वाटत आहे. भारतवर्षाच्या अध्यक्षांचा मुकुट बेळगावच्या महासभेत गांधीजींना घातला होता ना?

पर्वतराज हिमालय मनात हसत आहे. “कोण ह्या सगळ्यांच्या बरोबर भांडणार ? गांधीजी, स्वतःच्या मनात कुणाची इच्छा करीत आहेत, हे ते बिचारे काय ओळखणार?”

अहोभाग्य आहे त्या छोट्याशा शेगावचे ! हिंदुस्थानच्या मध्यबिंदूवर असणाऱ्या ह्या खेडेगावाचे नाव पण कुणाला माहीत नव्हते. दुसऱ्यांप्रमाणे त्यांनी अधिकार दाखविला नाही, तक्रार केली नाही, मागणी केली नाही, तरी सुद्धा गांधीजींनी त्याला आपलेसे केले.

## २. जात

गांधीजी जातीने मोढ वाणी होते. पण ते स्वतः काय म्हणत होते ?

एकदा सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाची केस केली होती. अहमदाबादच्या न्यायलयात काम चालू झाले.

न्यायलयातील न्यायाधीश नाव तर विचारणारच ना ?

“तुमचे नाव काय ?”

-मोहनदास करमचंद गांधी.

-“कुठले राहणारे ?”

सत्याग्रहाश्रम साबरमतीचे.

“कसला व्यवसाय ?”

-विणकर व शेतीचा.

हे शेवटचे उत्तर ऐकून न्यायाधीश चकित झाले. लोकपण पहात राहिले.

# ३. पुतळीबाई

गांधीजींच्या आईचे नाव पुतळीबाई होते. त्या खूपच श्रद्धाळू होत्या. पूजापाठ केल्याशिवाय त्या कधी जेवत नसत. नेहमी मंदिरात दर्शनास जात असत.

एक पण एकादशी सोडत नसत. एकदाच जेवणे हे तर त्यांना सहज शक्य होते.

चातुर्मासात त्या चांद्रायण-व्रत, पारणे वगैरे व्रते करीत असत.

चातुर्मासात त्या असे कडक व्रत करीत असत की, सूर्य-दर्शन झाल्यावरच जेवायचे.

अशा श्रद्धाळू आईबद्दल मुलांना प्रेम वाटले तर त्यात नवल काय? कधी जर आईला उपाशी रहावे लागले तर मुले ढगासमोर पहात रहात अन सूर्य-दर्शन झाले तर आईला सांगण्यास पळत येत असत.

“आई! धाव, धाव सूर्य दिसला.” पण आई येण्यापूर्वीच सूर्य अदृश्य होत असे. अशा प्रकारे खूपदा त्यांना उपवास घडे.

पण आई खूप स्वाभिमानी होती, काहीही झाले तरी, आजारी झाली तरी, धेतलेले व्रत कधी सोडले नाही.

गांधीजीचीं आई अशी पवित्र आणि स्वाभिमानी होती.

# ४. बा (आई)

तुम्ही खूपजणांनी बापूजींना पाहिले असेल, पण कस्तुरबाना तर क्वचितच कुणी पाहिले असेल.

“बा” कुणी थोर माताजी होऊन थोड्याच बसून रहात? आश्रमात असताना त्या बापूजींच्या गादीवर दर्शन देण्यास थोड्याच बसत? नाही. ‘बा’ तर न जाणो कुठेही काम करीत असत. अथवा स्वयंपाक घरात पोळ्या करीत बसत किंवा बापूजींचे जेवण तयार करीत अथवा कुणा आजाऱ्याची सेवा करीत. गांधीजी कधी जर आजारी असले तर, त्यांचे डोके दाबण्याचे काम तर ‘बा’ चेच. त्यावेळी त्यांचे दर्हन होत असे खरे.

कुठे सभा असेल तेव्हां 'बा' बापूजीसह कुठे भाषण करीत असतीळ अशा नव्हत्या. त्या तर बायकांमध्ये गुपचुप जाऊन बसत, आणि कुणाच्याही लक्षात येत नसे. अथवा रहाण्याच्या जागी जाऊन काम करण्यात गढून जात.

“बा” ना मोठे होणे मुळीच आवडत नसे. त्यांना एकच गोष्ट आवडत असे – बापूजींच्या मागोमाग चालणे व त्यांची सेवा करणे. सीतेने रामासाठी राजवैभवाचे सुख त्यागले अन् वनवास ग्रहण केला. तसेच ‘बा' नी पण राजा सारखे सुख सोडून त्या बापूजींसह आश्रमवासी झाल्या.

## ५. परीक्षा

गांधीजी दुसरी तिसरीत इंग्रजी शिकत होते.

शाळेत एकदा विद्याधिकारी तपासणीस आले अन् त्यांनी वर्गात सर्व विद्यार्थ्यांना पाच इंग्रजी शब्द लिहायला दिले.

वर्ग-शिक्षक फिरत फिरत तिरप्या दृष्टीने विद्यार्थी काय लिहतात ते पहात होते. त्यांची छाती धडधडत होती. कुणी चुकीचे लिहले तर, अपयशाचे खापर शिक्षकांच्या डोक्यावरच् फुटणार ना? अधिकारी म्हणतील, शिक्षकांनी चांगले शिकविले नाही.

मोहनदासनी 'केटल' (Kettle) शब्दाचे शुद्ध-लेखन चुकीचे लिहिले होते. ते शिक्षकांच्या लक्षात आले; पण बिचारे काय करणार? फिरत फिरत ते त्याच्याजवळ गेले आणि त्याच्या पायावर बुटाच्या टोकाचा स्पर्श केला, डोळ्यांनी खूण करुन, शेजारया विद्यार्थ्यांची पाटी दाखविली. पण चोरी करावी असा विचार मोहनदासच्या स्वप्नात देखील नव्हता. त्यांना कसे समजणार की, गुरुजी दुसऱ्यापासून चोरी करून शुद्ध लेखन लिहिण्याचा धडा देत आहेत ?

दुसऱ्या दिवशी गुरुजीनी सांगितले, “खरोखर, मूर्ख मुलगा! किती सूचना देऊनसुद्धा समजले नाही.”

गांधीजी गुरुजींसमोर नाहीत; बोलले। पण मनात समजले की त्यांचा उपदेश घेण्यासारखा नव्हता कारण तो असत्याचा आदेश होता.

## ६. सत्य

गांधीजी लहान होते तेव्हापासून त्यांचे सत्यावर प्रेम होते.

लहान होते तेव्हां थोडे दिवस ते कसे वाईट संगतीत होते, ही गोष्ट त्यांनी स्वतः लिहिली आहे.

मुलांना नाश्ता करण्याचा व बिडी ओढण्याचा छंद लागला होता, अशा कामासाठी पैसे आई वडिलांकडून धेता येत नाहीत म्हणून ती मुले नोकरांच्या खिशातून पैसे चोरण्यास शिकली.

अशा कामामुळे मोहनचा जीव गुदमरत असे पण मित्रांना पहाताच बिडीचा मोह आवरत नसे.

असे करता करता नाश्ता-पाण्याचे कर्ज झाले.

कर्ज देणारा मागणी करी. आता काय करावे? त्याने जर लोकांच्या समोर पैसे मागितले तर? कदाचित घरी येऊन वडिलांसमोर मागितले तर ?

नोकराच्या खिशातून तर पै-पैसा मिळे आणि कर्ज तर खूप वाढले होते. आता काय करायचे ?

अशा प्रकारे मित्र-मंडळीचा धोळका काळजीत पडला. धोळक्यात मोठा भाऊ पण होता. त्यांना त्यांतून सुटण्यासाठी चोरीचा विचार आला. "माझ्या हातात सोन्याचे कडे आहे त्यातून एखाद तोळा सोने काढले तर, कर्ज चुकवले जाईल आणि कुणाच्या लक्षात येणार नाही."

मोहनला ते विचित्र वाटले पण त्याची बोलण्याची हिंमत झाली नाही. त्याने कडे कापू दिले.

कर्ज तर चुकवले पण ज्यांना सत्य प्रिय होते त्यांना चैन कसे पडणार ?

"अरेरे! मी चोरीत फसलो! अझा नाश्त्यात धूळ पडो, अशा बिड्या जळोत!"

पुन्हा विचार आला, “अरे, यात तर आम्ही वडिलांना पण फसविले.”

मोहनचे ना जेवणात लक्ष होते ना कामात! आतल्याआत त्याचे मन त्याला खात होते.

शेवटी निश्चय केला. “वडिलांजवळ जाऊन माझे पाप कबूल करेन ते रागावले तर सहन करेन, मारले तर मार खाईन.”

वडिलांसमोर तोंडाने बोलण्याची हिंमत तर कशी असणार? गांधीजीनी एक चिठ्ठी लिहून त्यात स्वतःचे सर्व पाप कबूल केले व वडिलांची माफी मागितली. भरलेल्या डोळ्यांनी व थरथरत्या हाताने चिठ्ठी वडिलांच्या हाती  दिली. चिठ्ठी वाचून वडिलांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. त्यांनी अपयश माफ करून सत्यवादी पुत्रास हृदयाशी धरले.

# ७. प्रल्हाद व हरिश्चंद्र

ह्या दोन सत्याग्रहींच्या कथा गांधीजींना बालपणापासून खूप प्रिय होत्या. ज्याला स्वतःला सत्य प्रिय होते त्याला सत्यवादीची कथा प्रिय असणारच ना?

राजा हरिश्चंद्रनी सत्यामुळे किती तरी दुःखे सहन केली. राज्य गमावले, वैभव सोडले, वना-वनातून ते भटकले, पत्नीस विकले, पुत्र विकला, शेवटी स्वतःलापण डोंबाच्या घरी विकले. रोमांच उभे राहतील; अशी दुःखे आली पण सत्य सोडले नाही.

गांधीजींनी बालपणी हरिश्चंद्राचे नाटक पाहिले होते व ते पाहिल्यापासून त्यांना हरिश्चंद्राची स्वप्ने येत असत. हरिश्चंद्राच्या आठवणीने ते स्वतः रडत असत. त्यांनी लिहिले, 'आज पण ते नाटक वाचले तर मला रडू येते.' ते म्हणत की, हरिश्चंद्राप्रमाणे दुःखे सहन करणे अन तरी पण सत्याचे पालन करणे हेच खरे सत्य.

हरिश्चंद्राच्या कथेपेक्षा प्रल्हादची कथा गांधीजींना अधिक प्रिय होती. हरिश्चंद्र तर राजा होता. अनुभवी व ज्ञानी होता; पण प्रल्हाद ?

तो तर छोटा नाजूक बाळ होता. राक्षसाच्या घरी जन्म घेऊन पण त्याने राम नाम घेण्याची हिंमत केली. वडिलांनी पर्वतावरून ढकलले तरी पण त्याने राम-नाम सोडले नाही, नदीत बुडवले तरी, राम-नाम सोडले नाही. धगधगत्या खांबाला भेटताना तो बाळ घाबरला नाही व रामाचे नाव त्याने सोडले नाही.

गांधीजी प्रल्हादाचा सत्याग्रह नेहमी दृष्टिसमोर ठेवीत व पावलो-पावली त्याचे उदाहरण देत असत. “प्रल्हादासारखा छोटा बाळ; पण सत्याग्रहाची शक्ती दाखवू शकतो. सत्याग्रह करण्यासाठी मल्लाप्रमाणे अंगबळ हवे अथवा राजाप्रमाणे सैन्यबळ हवे असे काही नाही.”

## ८. वैष्णव

गांधीजींना विचारळे की, आपण कुठला धर्म पाळता ? तर ते म्हणतील, – वैष्णव धर्म.

ज्याला कळणार नाही त्याला नवल वाटेल. गांधीजी मंदिरात जात नसत, कृष्णाची मूर्ती घरात ठेवत नसत, छप्पन भोग घरीत नसत, कंठी व माळा धारण करीत नसत, कुणाबरोबरही बसून खात असत –

ते वैष्णव कसे असणार?

गांधीजी म्हणत, “माझ्या मनाने तर मी वैष्णवच आहे. नरसैया वैष्णवाचे लक्षण दाखवून गेला आहे त्या वैष्णवाला मी ओळखतो आणि तसा वैष्णव होण्याचा मी प्रयत्न करीत आहे –“

वैष्णव जन तो तेने कहीअे

जे पीड पराई जाणे रे,

परदु:खे उपकार करे तोये

मन अभिमान न आणे रे

सकळ लोकमां सहुने वंदे

निंदा न करे केनी रे

वाच-काछ मन निश्चल राखे

धन धन जननी तेनी रे. – वैष्णव

समदृष्टिने तृष्णा त्यागी

परस्त्री जेनी मात रे

जीहवा थकी असत्य न बोले

परधन नव झाले हाथ रे. – वैष्णव

मोह-माया व्यापे नहि जेने

दृढ वैराग्य जेना मनमां रे

रामनाम शुं ताळी रे लागी

सकळ तीरथ तेना तनमां रे.  – वैष्णव

वणलोभी ने कपटरहित छे.

काम-क्रोध निवार्या रे

भणे नरसैयो तेनुं दर्शन करतां

कुळ अेकोतेर तार्या रे.        – वैष्णव

# ९. चरखा

“हे ईश्वरा, मरण देशील तेव्हां असे मरण दे की, एका हातात चरख्याचा दांडा असेल व दुसऱ्या हातात पेळू राहिला असेल.”

अशी प्रार्थना कोण करीत होते ?

गांधीजी; दुसरे कोण असू शकेल ?

त्यांना चरखा खूपच प्रिय होता.

सूतकताई हा त्यांचा रोजचा नियम होता. कितीही काम असो, पण ते काही सूत कातण्याशिवाय राहत नसत.

प्रवासात असले तरी त्यांच्याबरोबर चरखा ठेवीत असत व वेळ सापडताच जरुर सूत कातीत असत. आजारी असले अन अशक्तपणा आला असला तरी, ते सूत कातण्याचा आग्रह ठेवत असत.

तुरुंगात जातानापण स्वतःच्या प्राणासमान चरख्याला पण ते बरोबर घेऊन जात असत.

येरवडा जेलमध्ये गांधीजींनी दोन चक्रे असाणाऱ्या चरख्यावर सूत कातता कातता खूप विचार केला आणि त्यातून “लहान अन नाजूक” सुंदर अन् मधुर” येरवडा चक्राचा जन्म झाला.

सूतकताई देशातील कोटी लोकांना वस्त्र देऊ शकते व उपाशी लोकांना भाकरी देऊ शकते. चरख्याचे सुत स्वराज्य देऊ शकतात, म्हणून गांधीजी त्याला कामधेनू म्हणत असत, आणि त्याचा स्वरात मधुर संगीताचे सूर ते ऐकीत.

देशातील कोट्यावधी दरिद्री लोकांना श्रम करून पण पोटभर खायला मिळत नसे. त्यांच्या बरोबर एकतेचा अनुभव कसा घेणार ? त्यांच्या बरोबर आपल्याला पण काही परिश्रम करायला हवेत म्हणून प्रत्येकाने रोज अर्धा तास सूत कातून दरिद्री देश-बांधवांबरोबर एकतेचा अनुभव करावा असा गांधीजींचा उपदेश आहे.

तिरंगी राष्टध्वजात गांधीजींनी चरख्याचे चिन्ह अंकित केले आहे. कोट्यावधी दरिद्री लोकांचे स्वराज्य तेच खरे स्वराज्य असे त्यांनी जाहीर केले.

## १०. गांधीजी कसे रहात होते?

गांधीजी कसे रहात होते ते ओळखण्याची तुमची इच्छा आहे का? ते रोज सकाळी चार वाजता उठत असत, दंत-मंजन झाल्यावर प्रार्थना करीत. प्रार्थनेनंतर व्यायामासाठी थोडे फिरण्यास जात असत.

परत फिरताना ते आश्रमात जर कुणी आजारी असेल तर त्याला भेटून येत.

नंतर ते स्वयंपाकगृहात जाऊन स्वतःच्या वाट्याला आलेले भाजी चिरण्याचे काम करीत व नाश्ता धेत असत.

नंतर त्यानी ज्याना भेटीस बोलाविले असेल त्यांच्यासह गप्पा करीत अथवा पोस्टाने पत्रे आली असली तर त्याची उत्तरे देत अथवा ‘नवजीवन’ साठी ठेख लिहीत असत.

भोजनाच्या प्रसंगी वाढण्याचे काम त्यांचेच.

दुपारी ते सूतकताई नियमित करीत. कमीत कमी एक तास सूतकताई व कमीत कमी १६० तार कातणे असा त्यांचा नियम होता.

संध्याकाळी ते सूर्यास्ताच्यापूर्वी भोजन करीत व भोजनानंतर थोडावेळ फिरण्यास जात असत.

शिवाय ते समय-पत्रकाप्रमाणे महिलांच्या वर्गात, अथवा विद्यार्थ्यांच्या वर्गात अथवा बालमंदिरात जाऊन शिकवीत असत.

अशाप्रकारे सबंध दिवस काम करून गांधीजी रात्री नऊ वाजता झोपत असत; पण खूपवेळा काम इतके अधिक असे की, उशिरा-पर्यंत जागून ते पूर्ण करीत. उशिरा झोपले तरी सकाळी चार वाजता उठायचे, त्यात काही फरक नसे.

# ११. सत्याग्रहीची दिनचर्या

सत्याग्रहीची दिनचर्या कशी असते ते पाहिले ? त्यात एक क्षण पण आळसात घालविलेला दिसणार नाही.

गांधीजींच्या दिनचर्येमध्ये एक दुसरी विशेष खुबी होती की, ते स्वतः दिवसाच्या कामाचे समयपत्रक तयार करीत अन त्यावरहुकूम प्रत्येक मिनिट वागत असत. ज्या कामासाठी जो तास नक्की ठरला असेल त्याप्रमाणे तेच काम त्या तासाला सुरू करीत व त्याच तासाला पूर्ण करीत. ते स्वतःचा सबंध दिवस घड्याळ्याच्या काट्याप्रमाणे घालवीत.

दिवसा काय काय कामे कधी केली त्याची दैनंदिनी पण ते ठेवीत असत आणि झोपण्यापूर्वी ती पहात असत.

# १२. मौनवार

गांधीजी प्रत्येक सोमवारी मौन पाळीत असत. त्यामुळे ते त्यादिवशी बोलत नसत, कुठलेही काम जरी असले तरी ते मौन तोडत नसत. जरूर  वाटली तर कागदावर लिहून सांगायचे असेल ते सांगत. पण मुळीच बोलत नसत.

आठवड्यातून एकदा असे मौन ठेवण्यामुळे त्यांना खूप शांती मिळत असे. त्यादिवशी गप्पा-गोष्टी करायच्या नसत, सभेत भाषणे करायची नाहीत म्हणजे फिरणे सुद्धा त्यादिवशी आपोआप बंद रहात असे.

मौनवाराच्या शांतीमुळे त्यांना खूपच आराम मिळत असे; पण आरामाचा उपयोग ते कसा करीत?

गांधीजी काही आरामाचा दिवस झोपून तर काढीत नसत. सबंध आठवड्याचे जे काही काम राहिले असेल ते सर्व मौनाच्या वेळी संपवून टाकीत.

मौन ठेवल्यावर काम करण्यात किती आनंद असतो त्याचा अनुभव घेण्यासारखा आहे.

# १३. गांधीजींची वैशिष्ट्ये

गांधीजीची कित्येंक वैशिष्टये जाणण्यासारखी आहेत.

ते कधीच हळू-हळू चालत; नसत पण नेहमी स्फूर्तीने चालत असत.

ते कधीच ढिले बसत नसत. नेहमी ताठ व स्थिर आसन लावून बसत.

ते टेबलाला टेकून लिहीत नसत, सरळ बसून मांडीवर कागद ठेवून लिहीत असत.

ते लिहलेले पुन्हा वाचल्या-शिवाय पुढे जात नसत. पोस्टकार्ड लिहले तरी वाचून चूक सुधारून मग पोस्टाच्या पेटीत टाकत असत.

त्यांना स्वच्छता व टापटीपीची फार आवड होती म्हणूनच त्यांचे कपडे व दुसऱ्या वस्तू खूपच स्वच्छ व व्यवस्थित राहत होत्या.

जे काही काम करीत ते बाइकाईने करीत असत.

गांधीजी फोटो काढण्यास कधी बसत नसत. कितीही कामे असली तरी, जर कुणी छोटे बाळ आलेच तर गांधीजी त्याच्याबरोबर गम्मत केल्याशिवाय राहत नसत.

गप्पा-गोष्टी करीत असता गांधीजी सात मजली हास्य करीत.

# १४. आश्रम - १

गुजरातची जुनी राजधानी अहमदाबाद ह्या शहराच्या जवळ साबरमती नदीच्या किनाऱ्यावर गांधीजींचा आश्रम आहे.

आश्रमात गांधीजी राहत असत, कस्तुरबा राहत, आणि दुसरे खूप पुरुष, महिला, मुलें व मुली राहत असत.

त्यात गुजरातमधील लोक होते, महाराष्ट्रातील होते, पंजाबचे होते, सिंधचे होते, मद्रासचे होते, नेपाळचे पण होते. हिंदुस्थानचे होते व हिंदुस्थान बाहेरचे गोरे आणि चिनी पण येऊन राहत होते.

ते सर्व खादी धारण करीत व नियमित सूत कताई करीत. ते रोज पहाटे चार वाजता उठून प्रार्थना करण्यास एकत्र येत आणि संध्याकाळी पण प्रार्थना करण्यास जमत असत. तेथे ते श्लोक म्हणत असत. पंडितजी भजने शिकवीत, ती ते गात असत आणि रामाचे नाव घेत. शिवाय ते गीता-पारायण पण करीत असत. प्रार्थनेनंतर गांधीजी प्रवचन करीत असत.

सबंध आश्रम एका भोजनगृहात जेवत असे. जेवणात ते मसाला, मिरची, हिंग फोडणी वगेरे मसाला करीत नसत. पण शुद्ध व स्वच्छ आहार घेत. व ठरलेल्या वेळी सर्वजण एकत्र बसून, शांति-मंत्र म्हणून जेवत असत. खूपदा गांधीजी स्वत: वाढत असत. आश्रमात हरिजन सर्वांबरोबर राहत आणि सर्वांबरोबर आश्रमातील स्वयंपाक-घरात कामे करीत व जेवण करीत.

आश्रमात स्वच्छेतेची खूपच काळजी घेण्यात येत होती. कुठेही थुंकायचे नाही, कागदाचे तुकडे फेकायचे नाहीत, उष्टे, खरकटे सांडायचे नाही व लघुशंका करायची नाही.

आश्रमवासी वाटेल तेथे शौचास बसून जंगलाची जागा खराब करीत नव्हते. सुंदर, हवेशीर खोलीत शौचगृह तयार करीत आणि शौचानंतर स्वच्छ माती त्यावर झाकून ठेवीत. आश्रमवासी स्वतःच ह्या शौचगृहाची सफाई करीत. आश्रमाचा मळा त्या खतामुळे शोभित होत असे.

# १५. आश्रम - २

गांधीजींच्या आश्रमात एक छात्रालय होते. त्यात देश-विदेशातील विद्यार्थी राहत होते. कोणी सूत काताण्यास शिकत, कोणी पिंजण्यास, कोणी हातमागावर खादी विणण्यास शिकत होते, कित्येक विद्यार्थी सुतारी-उद्योगगृहात चरखे बनविण्यास शिकत होते.

आश्रमात मुले व मुली राहत होते. ते पण हे सगळे व्यवसाय शिकत असत, त्याचबरोबर ते शिक्षणपण घेत असत.

आश्रमात स्त्रियांसाठी स्त्री-निवास होता. तेथे त्या रोज जमत व प्रार्थना करीत. काही वेळ अभ्यास व सूतकताई, पिंजण तर खरेच! आश्रमातील भोजनालय ह्या आश्रमवासी भगिनी संभाळत असत. त्या आलटून पालटून स्वयंपाक करीत व कोठारात धान्य साफ करीत.

आश्रमात छोट्या छोट्या मुलांसाठी बाल-मंदिर पण चालू होते परंतु त्यासाठी वेगळे शिक्षक कसे असणार ? नाही. बाल-मंदिर आश्रमवासी महिला चालवीत असत.

आश्रमात एक छोटे चर्मालय पण होते. त्यात मेलेल्या पशूंचे चामडे असे. कत्तल केलेल्या प्राण्यांचे चामडे वापरणे हे कत्तल करण्यास साथ दिल्यासारखे म्हणून आश्रमवासी ह्या अहिंसक चामड्यांचे जोडे, चंपल वगैरे वापरीत असत.

आश्रमात शेती-वाडी पण होत होती. त्यात फळ-झाडें लावली होती. वेगवेगळी कापसांची रोपे पण लावली होती आणि भाजीपाला पण होत होता. शेतांत धान्य व कापूस होत असे.

ह्या सर्व कामांत आश्रमवासी पुरुष, स्त्रिया व मुले भाग घेत होती. ते आलटून-पालटून स्वयंपाक घरातील कामें करीत, पाणी भरीत, भांडी घासत झाडलोट करीत व गौशाळेचा गोठा साफ करीत, शौचालय स्वच्छ करीत व मळ्यात पण कामे करीत.

सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत गांधीजींचा आश्रम मधाच्या पोळ्याप्रमाणे निरनिराळ्या व्यवसायांनी गुंजीत राहत असे. गांधीजींनी त्याचे नाव 'उद्योग-मंदिर' ठेवले होते. ते खरोखरच योग्य होते.

# १६. नोकर

पाणी भरणे, भांडी घासणे, झाडणे, दळणे, स्वयंपाक करणे, कपडे धुणे, शौचगृह साफ करणे ही सर्व कामे लोकांमध्ये हलक्या दर्जाची समजली जातात. त्यांना वेळ मिळत नाही असे नाही, पण ही सर्व कामें कमी दर्जाच्या माणसांची आहेत, असे ते मानत असतात त्यामुळे ती कामें करण्यासाठी नोकर ठेवीत असत व नोकरांना कमी दर्जाचे समजून त्याच्या बरोबर तुच्छेतेने वागत असत.

गांधीजी कुठल्याही कामास हलके मानीत नव्हते. आश्रम सुरू करण्यापूर्वी पण त्यांचे ह्याच प्रकारचे विचार होते. त्यांच्या घरी नोकर ठेवीत नसत असे नाही, पण नोकरांबरोबर नोकरांप्रमाणे वागणूक नसे.

ते खूप लहान होते तेव्हा त्याच्या घरी रंभा नावाची मोलकरीण होती. गांधीजी त्या बाईची आपल्या सख्ख्या आई-प्रमाणे आठवण करीत असत. बालपणी रंभाने त्यांना शिकविले होते की, भीती वाटली की रामाचे नाव घेण्याने भीती दूर होते. हा उपदेश गांधीजी विसरले नव्हते.

बॅरिस्टर झाल्यावर गांधीजी मुंबईला थोडे दिवस राहिले. त्यावेळी त्यांनी स्वयंपाकासाठी एक ब्राह्मण नोकर ठेवला होता. स्वतः परदेशाला जाऊन आले असल्यामुळे रुबाबात आणि इंग्रजी थाटाने रहात असून सुद्धा नोकरास नोकराप्रमाणे वागवीत नसत. अर्धे जेवण स्वयंपाकी करीत असे, अर्धे जेवण स्वतः गांधीजी करीत. ते स्वयंपाक्याला शिकवीत असत. एकाच पंगतीत बसून त्याच्याबरोबर भोजन करीत असत. नोकराप्रमाणे काहीही भेदभाव ठेवीत नसत.

दक्षिण आफ्रिकेत त्यांचा पगार भरपूर होता. आणि घरची कामे जास्त असून सुद्धा शौचालय साफ करणें, कपडे धुणे, अशी सर्व कामें गांधीजी व कस्तुरबा हातानी करीत. घरात नोकर-चाकर पुष्कळ होते, पण त्या सर्वांना घरातील माणसांप्रमाणे ते आपल्या सारखे ठेवीत असत. आश्रमवासी झाल्यावर तर सर्व कामे हाताने करायची, नोकर ठेवायचा नाही, असा त्यांनी नियमच केला, ज्यांना सेवेसाठी जगायचे आहे त्यांना नोकर काय व मालक काय?

## १७. ह्या काठी गंगा आणि त्याकाठी यमुना

गोकुळाचे गीत येते ना ?

आणे काठे गंगा व्हाला,

पेले काठे जमना रे;

वचमां गोकुळियुं रुडूं गाम –

रुडूं गाम

रुडूं गाम रे !

गांधीजींच्या आश्रमाचे पण तसेच आहे त्याच्या एका बाजूला साबरमतीचा तुरुंग आहे व दुसऱ्या बाजूला दूधेश्वर स्मशान आहे.

सत्याग्रहींना शोभेल असेच स्थान गांधीजींनी शोधून काढले. सत्याग्रह्याला तुरुंगाची भीती नाही. आणि मृत्यूचे भय नाही. दोन्हीही त्याचे आवडते शेजारी !

आश्रमवासी लोकांना तुरुंग दाखवून गांधीजी म्हणत, कधी तरी आपल्याला तेथे रहायला जायचे आहे म्हणून तेथील कैद्यांप्रमाणे कठीण जीवन जगण्यास शिका.

दूधेश्वर दाखवून म्हणत, जेथे आपण रोज फिरण्यास जातो तेथे जाण्यास आपणास भीती कशाची ? म्हणून देशासाठी मरण्यास नेहमी तयार रहा.

अशा स्थानी कोण राहण्यास येणार ? ज्यांना देश-सेवेचा बोध ध्यायचा असेल, ज्यांना गांधीजीचा सत्संग ध्यायचा असेल, ज्यांना पवित्र आणि उद्यमी जीवन जगायचे असेल तेच तर येणार.

# १८. बाळ - काठी

गांधीजी फिरण्यास जात तेव्हा कित्येक मुले त्यांच्या बरोबर जात असत आणि बापूजींबरोबर गप्पा मारण्यात त्यांना मजा वाटत असे.

बापूजींसह फिराण्यास जाण्यास खरोकर मजा तर दुसरीच होती. चालत असताना गांधीजींना काठीचा आधार तर हवा ना? ही मुले त्यांच्या कुशीत शिरत असत आणि बापूजींचा हात स्वतःच्या खांद्यावर ठेवत असत.

असा प्रकारे दोन्हीं बाजूला दोन जिवंत काठ्या आणि मध्ये बापूजी गप्पा मारीत व हवा खात जात असत.

गांधीजी त्यांना स्वतःच्या बाळ-काठ्या म्हणत आणि आश्रमात मुलांना खूप दिवस बापूजींची काठी होण्यास मिळाले नाही तर त्यांना आवडत नसे.

पण बाळ-काठी होणे खरोखर सोपे समजू नका. गांधीजी वृद्ध असल्यामुळे हळू-हळू डोलत चालत असतील असे समजू नका. त्यांना तर स्फूर्तीने चालण्याची सवय होती. बाळ-काठ्या खूपच लहान असल्या तर बिचाऱ्यांना धावावेच लागे.

शिवाय फिरण्याच्या व गप्पाच्या नादात बाळ-काठ्यांना प्रार्थनेच्या वेळेचे भान राहत नसे; पण बापूजी थोडेच विसरणार ? वेळ व्हायला लागताच गांधीजी तर धावत सुटत, नंतर बाळ काठ्यांना पण धावल्याशिवाय काय गत्यंतर ?

## १९. पोशाकाचा इतिहास

प्रथम गांधीजी कोट-पाटलोण आणि टोपी घालीत असत. नंतर त्यांनी पैरण व लुंगी धारण केली त्यानंतर ते धोतर, अंगरखा, तसेच फेटा धारण करु लागले.

त्यानंतर गांधीजींनी खादीचा पंचा, खादीची पैरण, आणि खादीची टोपी घातली. नंतर ते फक्त पंचा नेसत.

पोशखात गांधीजींनी असे बदल का केले ते समजून घेण्यासारखे आहे.

ते तरुणपणात दक्षिण आफ्रिकेत राहण्यास गेले होते. तेथे वकिली करीत अन् इतर वकील-बॅरिस्टरांप्रमाणेच विदेशी पद्धतीचा पोशाख घालीत असत.

पण त्या देशात हिंदी लोकांचा खूपच अपमान होत असल्यामुळे गांधीजींनी आपल्या प्रजेला तयार करून सत्याग्रह केला.

त्यांच्या सैन्यांत गरीब-हिंदी मजूर होते. त्यांचे नेतृत्व घ्यायचे आणि त्यांच्यापेक्षा चांगला पोशाक घालायचा, चांगला आहार घ्यायचा हे कसे शक्य आहे? अन् गांधीजी सारख्या पुढाऱ्याला तर हा भेदभाव कसा सहन हाणार ?

तेव्हापासून त्यांनी निश्चय केला की माझ्या मजूर-बांधवाप्रमाणेच मी कपडे धारण करीन.

आता ह्या सत्याग्रही सैन्याच्या पुढाऱ्याने पण लुंगी-पैरण घातली आणि विदेशी पद्धतीच्या कोट-पाटलोणीस निरोप दिला.

दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहात हिंदी लोकांचा विजय झाल्यावर गांधीजींनी विचार केला की आता आपल्या देशात जाऊन भारतमोतेची सेवा करावी.

देशात जाऊन कुठला पोशाक ठेवावा ? गांधीजी तर सत्याग्रही व अशा लहान सहान गोष्टीत पण सत्याचा शोध करुनच पाऊल उचलणार, त्यांना वाटेल तो पोशाक घालून आपल्या देशात येण्यास कसे आवडेल ? घरी येऊन विलायती कोट-पाटलोण तर घालायची नाही. लुंगी

ठीक पण परदेशात लुंगीधारी लोकांसह परिधान केली ते शोभले पण ह्या देशात ती ठीक वाटत नाही.

विचार करीत असता त्यांनी निश्चय केला की जन्मभूमी काठियावाडचा पौशाक घालूनच हिंदभूमीच्या किनाऱ्यावर उतरेन.

असा प्रकारे हिंदुस्थानला परतल्यावर गांधीजी धोतर, अंगरखा घालीत असत, खांद्यावर उपरणे ठेवीत अन् डोक्याला सफेद फेटा बाधीत असत.

## २०. खादी

पूर्वी गांधीजींना चरखा कुठे सापडला होता ? त्यावेळी सूत कुणाला कातता येत होते ? त्यावेळी शुद्ध खादी कुणाला माहीत होती ?

ते सर्व नंतर समजू लागले. त्यापूर्वी गांधीजी स्वदेशी मिलच्या कापडातून कपडे तयार करीत.

नंतर कित्येक जण हातमागातर विणण्यास शिकले व त्यावर विणलेले जाड कापड गांधीजी वापरू लागले. पण हातमागातर सूत तर मिलचेच होते. हातानी कातलेले सूत कोठून अणणार ?

असे करता करता सर्वात शेवटी गांगाबाई मुजुमुदारांची भेट झाली. त्यांच्या मदतीने गांधीजींच्या हाती चरखा आला.

नंतर खूपजण कातण्यास शिकले आणि चरख्यावर कातलेल्या सूतानी विणण्यास पण लागले.

आता गांधीजी मिलच्या सुतापासून तयार झालेले कापड कसे वापरणार? शुद्ध खादीचेच कपडे तेव्हापासून ते घाळू लागले.

ते खादीचे कपडे वापरू लागेल खरे, पण सगळे कपडे घालीत असत.

म्हणजे खादीचे लांब धोतर असे, पैरण असे, आणि त्यावर लांब बाहीचा अंगरखा असे, डोक्यास खादीचा लांब फेटा, आणि खांद्यावर लटकणारे उपरणे असे.

एवढे सर्व कपडे घालून त्यांना हिंडणे आवडत नसे; पण सभ्यतेसाठी ते वापरीत असत.

पण एक प्रसंग घडला. गांधीजींना वाटले की खोट्या सभ्यतेसाठी मी एवढे कपडे व्यर्थ का घालू ?

ह्या प्रसंगातूनच खादीच्या टोपीचा जन्म झाला.

# २१. खादीची टोपी

अहमदाबादच्या मिल-मजुरांची मालकांबरोबर तक्रार झाली.

त्यांनी संप केला. त्याचे नेतृत्व अनुसूयाबाईंनी घेतले. आणि अनुसूयाबाईंनी पुढारीपणा घेतल्यावर त्यात गांधीजी तर असणारच ना?

चळवळ जवळ जवळ कित्येक महिने चालू राहिली. गांधीजी रोज मजुरांना भेटून त्यांना सल्ला देत असत.

गरीब मजूर बेकार होत होते. त्यांना खायला काहीच नव्हते, तरीपण ते उत्साहानी गांधीजींचा सल्ला ऐकावयास येत आणि संप करण्यात दृढ राहिले.

दिवसें-दिवस गांधीजी मजुरांबरोबर अन् मजूर गांधीजींसह जणू काही एकरूप झाले.

जरा फरक जाणवला की गांधीजींना दुःख होई, “ह्या मजुरांना शरीरावर घालायला चिंध्या पण नाहीत आणि मला इतके सर्व कपडे का? माझ्या ह्या लांब फेट्यामधून तर दहा टोप्या होतील व दहा माणसांची डोकी झाकली जातील.”

तेव्हापासून त्यांनी फेटा उतरवून सफेद टोपी चालू केली. घोतर आखूड केले, लांब अंगरखा व्यर्थ समजून घातला नाही आणि आखूड पैरणीने चालविले.

ह्या प्रमाणे त्यावेळी मजुरांबरोबर स्वतःची एकता केली. तेव्हाच गांधीजींचा सत्याग्रही आत्मा संतुष्ट झाला.

## २२. सफेद टोपी

गांधीजी सफेद टोपी वापरू लागले, तेव्हां लोकांना खूप नवल वाटले.

“सफेद टोपी? अरे, पण टोपी सफेद असते? लाळ असते, हिरवी असते, पिवळी असते, काळी असते; पण सफेद टोपी असू शकेल का?”

“अरे पहा तर खरे, गांधीजींनी सफेद टोपी घातली !” असे सांगून लोक हसत, कुणी म्हणेल, ही तर जणू काही काशीच्या ब्राह्मणा सारखीच टोपी !”

पण लोक हसतात म्हणून काय गांधीजी काय घाबरणार ? असो. “त्याच्या डोळ्यांना सफेद टोपी खराब दिसत असेल, पण खादी फुकट जाण्यापेक्षा वाचते ना ?”

खरे पाहता, मळ तर सफेद टोपी प्रमाणे काळ्या टोपीला पण लागेल; पण काळ्यात काळे एकरूप होईल म्हणून मळ दिसणार नाही.

गांधीजी म्हणाले, मळ लपविताना रंग चढवावा लागतो, त्यापेक्षा परिश्रम करुन धुवून काढले तर ? सफेद टोपी रोज धुवून स्वच्छ होईल, मळ चढूनच का द्यावा?

# २३. सफेद टोपी जिवंत राहिली

सफेद टोपी दीर्घ आयुष्य घेऊन जन्मली होती आणि तिचा जन्मदाता गांधीजी जर स्थिर सत्याग्रही, तर कितीही विरोध झाला तरी ती कशी मरणार ?

आणि दिवसें-दिवस तिचा विकास झाला व हसणारे हळू-हळू गप्प झाले. सर्वांना सफेद टोपीची सवय झाली, सर्वांना ती आवडली.

गरीब माणसांना स्वस्त वाटली म्हणून त्यांनी ती धारण केली.

स्वच्छ माणसांनी रोज धुवून साफ करता येईल म्हणून ती धारण केली.

कवी व कलाकार पण सफेद टोपी घाला अशी प्रशंसा करू लागले. खरी सुंदरता तर ह्यात आहे, आता काळी टोपी कोण घालेल ?

स्वयंसेवकांचा तर तो राष्ट्रीय पोशाक झाला. मुले सफेद टोपी घालण्यात अभिमान बाळगू लागले, कारण ती घालून ते भारतमातेचे सैनिक दिसू लागले.

असे करता करता खादीच्या सफेद टोपीचे नाव प्रसिद्ध झाले – "गांधी टोपी" !

# २४. गांधी टोपी

मालक : मुनीमजी, ह्यापुढे तुम्ही गांधी टोपी घालून येऊ नका.

नोकर : शेठ, तुम्ही तर न पाळता येण्यासारखे हुकूम करीत आहात.

मालक: ते तुम्ही समजा, पण आमच्या येथे गांधी टोपी चालणार नाही.

नोकर : पण माझे तर खादीचे कपडे घालण्याचे व्रत आहे, ते मी कसे मोडू?

मालक : तुम्हाला खादी न घालण्याबद्दल कोण सांगत आहे? फक्त काळी रंगवून घ्या बस,

नोकर : तर मग मला सफेद आवडत आहे आणि मी सफेद घालीत आहे त्यात हरकत का?

मालक : नोकरी करायची असेल तर सांगितल्याप्रमाणे वागा. सफेद टोपी घालून तुम्ही स्वयंसेवकांसारखे दिसता. आमच्या येथे स्वयंसेवक ठेवला आहे, असे जर सर्वांना कळले तर आमचे खूप नुकसान होईल.

नोकर : मालक, मला हे काही कळत नाही. तुमची नोकरी मी प्रामाणिकपणे करीत आहे. सफेद टोपी घातली तर त्यापासून तुम्हाला काय नुकसान होणार?

मालक: बधा, मुनीमजी, माझ्या बरोबर उगीच डोकेफोड करू नका. ही गांधी टोपी आहे व आमच्या येथे गांधी टोपी घालणारा असला तर खूपजणांना आमच्यावर संशय येईल,

नोकर: त्यात संशय कसा येणार? गांधीजी तर आपल्या देशाचे सर्वात पवित्र पुरुष आहेत.

मालक: ते असेल, पण उद्यापासून गांधी टोपी काढूनच नोकरी वर या.

नोकर: टोपी तर काढू शकणार नाही.

मालक : तर तुम्ही नोकरीतून सुटे झालात.

नोकर: जशी तुमची मर्जी.

मालक: बघा हं, नंतर पश्चाताप होईल. अशा सुतकी टोपीसाठी नोकरी सोडावी लागेल.

नोकर: मालक, तुमच्या सल्ल्याबद्दल आभारी आहे. पण मी पोटासाठी देश आणि गांधीजींचा अपमान सहन करू शकत नाही. नमस्ते !

वरचा संवाद तर काल्पनिक आहे. पण सरकारी कथेच्या, परदेशी व्यापाऱ्यांच्या पेढ्यांमध्ये आणि थोड्या हिंदी व्यापारी पेढ्यांमध्ये पण अशा घटना घडत होत्या.

शूर नोकराने नोकरीचा त्याग केला पण गांधी टोपी काढली नाही.

गांधी टोपीचे मूल्य तर फक्त चारच आणे, पण आता तर, त्याचे मूल्य इतके अधिक झाले आहे की, ती अमूल्य झाली आहे.

प्रथम मूल्य हे की, त्या टोपीची सुरुवात गांधीजींनी केली.

दुसरे मूल्य हे की, ती पवित्र खादीची आहे. तिसरे मूल्य हे की ती नेहमी बगळ्याच्या पंखाप्रमाणे शुभ्र ठेवता येई.

चौथे मूल्य हे की ती सुंदर होती. पांचवे मूल्य हेच की ती हलकी, साधी व स्वस्त होती.

सहावे मूल्य हे की ती आपल्या राष्ट्रीय पोशाखाच्या गौरवास पात्र ठरली.

सातवे मूल्य हे की, तिचे नाव गांधी-टोपी असे छापले गेले होते.

आणि सर्वाहून अधिक मूल्य तर हेच की, टोपीमुळे खूपशा देशभक्तांनी आपले बलिदान दिले.

अशी अमूल्य गांधी-टोपी घालण्याचा कोणाळा अभिमान होणार नाही ?

# २५. एकटी पैरण

गांधीजींचे आभार माना की आपल्याला फक्त पैरण घालून फिरण्याची परवानगी मिळाली.

पूर्वी तर? अरे बापरे ! सर्वात प्रथम गंजीफरास, त्यावर सदरा, त्यावर जाकीट व पुन्हा त्यावर कोट !

इतका सर्व थाट व त्यात दुपारचा उकाडा, शरीर तर बटाट्याप्रमाणे उकडून निघे आणि धामाधूम होई; पण सर्व पोशाख घातल्याशिवाय घराबाहेर पडण्याची हिंमत कोणाची असणार ?

कोट घातला नसेल तर पोशाक अपुरा समजला जाई ! उन सहन होत नसेल तरी, कोट घालायलाच पाहिजे. तेव्हाच पूर्ण पोशाख म्हणायचा.

कोटाशिवाय शाळेत गेलात तर शाळेमध्ये प्रवेश नसे. असे सांगत की अपूर्ण पोशाकाने शाळेत यायची बंदी आहे.

कोटाशिवाय कोर्ट-कचेरीत गेलात तर उभे पण राहू देणार नाहीत. म्हणायचे, असल्या जंगली माणसाचे येथे काम नाही.

सर्वच उकडून मरत असत पण जंगली म्हणून घेण्याची हिंमत कोण करील ?

सत्याग्रही गांधीजींनी अशी हिंमत केली आणि एकटी पैरण घालून फिरण्याचे धाडस केले.

लोक हसू लागले. गांधीजी म्हणत, हसतो त्याला हसू द्या. पण आपल्या उष्ण देशात इतके सारे कपडे घालणे म्हणजे रानटीपणा आहे. आपल्या गरीब देशात इतके सर्व कपडे घालणे पाप आहे.

नंतर तर सर्वांना फक्त पैरण घालून फिरण्याचे धाडस झाले. शाळेतील विद्यार्थी आनंदित झाले. खादीची पैरण व खादीची टोपी आपला राष्ट्रीय पोशाख झाला.

## २६. भाषांचे ज्ञान

गांधीजींना पुष्कळ भाषा येत होत्या. ते एकपण भाषा पांडित्यासाठी शिकले नव्हते, सर्वच भाषा सेवेसाठी शिकले होते.

गुजराती तर मातृभाषाच होती.

इंग्रजी त्यांना शाळेत शिकविली आणि पुढे विळायत व दक्षिण आफ्रिकेच्या वास्तव्यात ती पक्की झाली.

दक्षिण आफ्रिकेत त्यांना मुसलमानांमध्ये राहून काम करावयाचे होते. त्यामुळे त्यांची सेवा करता त्यांना उर्दू बोलता येऊ लागले.

त्याचप्रमाणे ह्या देशात मद्रासी मजूर त्यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने सत्याग्रहात सामील झाले होते. त्यांची सेवा करण्यासाठी गांधीजींनी थोड्या फार प्रमाणात तामिळ भाषांचे ज्ञान संपादन केले.

हिंदुस्थानात स्वतःचा संदेश पोहचविण्यासाठी त्यांनी अनेक वेळा भ्रमण केले होते. त्यावेळी त्यांना राष्ट्रभाषा हिंदुस्थानीचे मूल्य नीट समजले होते. कुठल्याही प्रातांत गेले असता त्यांची हिंदुस्थानी लोक समजू शकत. पहिल्यांदा त्यांचे हिंदुस्थानी खूप कच्चे होते, पण आता त्यांनी ते व्यवस्थित सुधारून घेतले होते.

गांधीजी ह्या सर्व भाषा शिकले होते असे नाही. त्या त्यांना अनुभवांनी येत होत्या, तरी पण स्वतःची भाषा सुधारण्यासाठी जेव्हा त्यांना वेळ असे तेव्हा ते प्रयत्न करण्यास चुकत नसत.

दीर्घ तुरंगवासात त्यांनी तामिळ तसेच उर्दू साठी खूप मेहनत केली.

मराठी भाषा गांधीजींना येत होती असे नाही पण एकदा दक्षिण आफ्रिकेत गोखल्यांजवळ मराठीत भाषण करुन त्याचा अनुवाद स्वतः केला होता. त्यानंतर तर येरवडा जेलमध्ये आणि

शेगावला राहिल्यामुळे मराठीत त्यांनी अधिक प्रगती केली होती. संस्कृत ते बालपणी शाळेत थोडे थोडे शिकले होते. नंतर तुरुंगात त्यांनी त्या भाषेत प्रगती केली.

इंग्लंडमध्ये शिक्षण घेत असताना गांधीजींनी युरोपची जुनी भाषा लॅटिन तसेच युरोपच्या राष्ट्रभाषेप्रमाणे फ्रेन्च भाषेचे कामापुरते ज्ञान संपादन केले होते.

मातृभाषा गुजरातीचा त्यांनी विकास केला होता. त्यांची भाषा दंभरहित, सरळ, साधी, तेजस्वी व भावनाप्रधान होती.

# २७. आहारांचे प्रयोग

गांधीजींनी आहाराचे प्रयोग करण्याचा छंद बाळपणापासूनच होता. त्यांनी त्यांच्या जीवनात तसे अनेक प्रयोग केले व ते स्वतःवर करून पाहिले आणि तसे करीत असता खूपदा त्यांनी जीवाची जोखीम पत्करली होती.

त्यांचा मोठ्यात मोठा प्रयोग दुधासंबधी होता. पशुंचे दूध पिणे ह्यात गांधीजी एक प्रकारचा अधर्म व हिंसा समजत होते. शिशुसाठी ईश्वरानी सर्जन केलेला आहार आपण बळकावून घेतो. हे मोठे पाप समजले पाहिजे. दूध म्हणजे एक प्रकारचा सूक्ष्म मांसाहार आहे. असे विचार बळकट झाल्यावर गांधीजींनी आहारातून दुधाचा त्याग करण्याचे व्रत घेतले होते.

खूप वर्षापर्यंत दुधाशिवाय चालविल्यामुळे त्यांचे शरीर एकदा भयंकर आजाराने ग्रस्त झाले. दूध घेतले तरच आशा आहे असे डॉक्टरांनी जाहीर केले. शेवटी 'बा' च्या आग्रहांनी गांधीजींनी बकरीचे दूथ घेण्याचे चालू केले.

गांधीजींनी अनुभवांनी मान्य केले की दुधाशिवाय मनुष्याचे चालू शकत नाही. पण त्यांनी अशी आशा व्यक्त केली की, एक दिवस कोणी वैज्ञानिक जागृत होईल जो वनस्पतीमधून दुधाप्रमाणे च गुणकारी आहार सर्जन करून मनुष्य जातीस भेट देईल.

मिठाच्या बाबतीत देखील अनावश्यक समजून गांधीजींनी कित्येक वर्षे त्याचा त्याग केला होता पण नंतर त्यांना खात्री झाली की, त्या तत्त्वाची मनुष्याच्या आहारात जरुर आहे म्हणून त्यांनी ते चालू केले.

गांधीजी मानीत असत की मनुष्याचा संपूर्ण खरा आहार फळेंच आहेत मनुष्याच्या शरीराची रचना, त्याच्या हाता-पायाचा आकार, त्याचे दात, त्याचे पोट-ह्या सर्वांना पाहता मनुष्याला ईश्वराणी फळाहारी म्हणूनच निर्माण केले आहे. मुनष्याचा अगदी जवळचा भाऊ माकड. त्याच्या आहारावरून पण हेच अनुमान बळकट होते.

परंतु देशाच्या आजच्या परिस्थितीत गरीब भारतवासी फळाहार कुठून घेणार? गांधीजींनी स्वस्तात स्वस्त पदार्थ शोधून काढले. शेगदाणें, खजूर आणि केळी, ह्या आहारावर त्यांनी खूप वर्षे घालविली.

आपले भोजन शिजवण्यासाठी सुद्धा गांधीजींना आपल्या चालू रीती मान्य नव्हात्या. खरे म्हटले असता, तो आहार आगीद्वारा शिजवण्याची जरुरीच नव्हती. वनातील पिकलेली फळें, ज्यांना सूर्यानी, आपल्या उष्णतेने पिकविलेली असतात त्यांना जास्त पिकविणे हे त्यांना खराब करण्यासारखे आहे.

त्यावेळी गांधीजींना विचार आला की, धान्याला जर भिजविण्यात आले तर, ते शिजविण्याचा वेळ व खर्च भगिनी वाचवू शकतील. भिजविलेले अन्न खूप चावून खावे लागते आणि स्वयंपाकापेक्षा ते कमी प्रमाणात खाता येते. ह्याप्रमाणे ह्या गरीब देशाचा खूप फायदा होऊ शकतो.

लोक भाताची टरफले काढून पांढरा भात करुन खुश होतात आणि गहू वगैरे धान्यांचे टरफल फेकून बारीक मैद्यासारखे पीठ वापरतात, हे टरफल खूप मूल्यवान आहे. ते फेकणे म्हणजे आंब्याचा रस फेकून कोय चावण्या सारखे आहे ! ह्या वस्तू समजल्यावर गांधीजी भरड आणि जाड पिठांचा उपयोग करू लागले.

गांधीजींचे शरीर तर काचेच्या बांगडीप्रमाणे झाले होते. तरी पण त्यांचा आहाराचे प्रयोग करण्याचा रस कमी झाला नव्हता. छोटे-छोटे प्रयोग ते नेहमी करीत असत.

## २८. नैसर्गिक उपचार

आजारात माणसे बेचैन होत असतात आणि वैद्य-डॉक्टरांच्या पाठीमागे वळत असतात. डॉक्टरांनाच स्वतःचे रक्षण करणारे मानीत असतात. शरीराची काळजी घेण्याचा जणू काही स्वतःची जबाबदारीच नाही, ईश्वराने दिलेले हे अमूल्य यंत्र समजून घेण्याची जणू काही स्वतःचे कर्तव्यच नाही असे आपण वर्तन करीत असतो, आणि आजारातून चांगले झाल्यावर पुन्हा आपल्याला पसंत पडेल तसे वागतो व भोग-विलासात पडतो.

गांधीजींचे विचार ह्या विषयासंबंधी खूप समजण्यासारखे आहेत.

पहिली गोष्ट तर ही की, आजारीपणात बेचैन होऊ नये. शक्य असेल तसा उपाय करावा, पण डॉक्टरांनाच ईश्वर मानू नये.

दुसरे, सर्वच रोग आहाराच्या असंयमापासून निर्माण होत असल्यामुळे तशी चूक करू नये.

तरीपण आजारी झालोच तर, समजावे की खूपसे रोग आपल्या शरीर यंत्रावर लादलेल्या भारामुळे त्याला शुद्ध करण्यासाठी असतात म्हणून औषधाच्या बाटल्या रिकाम्या करण्यापेक्षा रोगांना स्वतःचे काम करू द्यावे. त्यामुळे थोडयाच दिवसात रोग आपोआप कमी होऊन शरीरातले दोष दूर होतील.

आजारी असताना औषधाच्या आधारावर रहाण्यापेक्षा नैसर्गिक उपचार करण्याचे गांधीजी पसंत करीत. ओल्या मातीच्या पट्टया ठेवून आणि कटिस्नान करण्याने कठिणात कठीण विषारी ताप आणि दुसरे रोग कमी होतात. असे प्रयोग करण्याची त्यांना आवड होती.

स्वत:वर तसेच आपल्या प्रिय-जनावरांवर त्यांनी असे प्रयोग केले होते, आणि त्यातून चांगली फळे मिळाली होती.

सूर्याची उष्णता, उघड्या आकाशाखाली झोपणे, हे पण गांधीजींच्या नैसर्गिक उपचारात येत असे.

पण त्यांचा मोठ्यात-मोठा उपचार तर लंघन होते. त्यांनी खूप बंधू-भगिनींना प्रोत्साहित करुन स्वतःच्या देखरेखीखाली मोठी मोठी लंघने करुन बरे केले होते.

कित्येक रोग तर आहारात योग्य फरक करून दूर होतात. हे पण, गांधीजींच्या सहवासात रहाणाऱ्यांना खूपवेळा प्रत्यक्ष पहायला मिळाले.

असे शंभरात ऐंशी रोग तर नैसर्गिक उपचारांनी दूर होतात आणि अशा प्रसंगी डॉक्टरकडे पटकन धावणे हे माणसांना शोभत नाही.

तरीपण गांधीजी मानीत असत की, कित्येक विषारी रोगांस नियमित औषध व कुशल डॉक्टरांची शास्त्रक्रिया आवश्यक आहे. त्यांना स्वतःला तशा खूपशा प्रसंगातून जावे लागले होते.

पण कुठल्याही प्रसंगी रोग्याला पाहून बेचैन होणे शोभत नाही. गांधीजींचा पुत्र रामदास यांनी तसेच पू. कस्तुरबांनी त्यांच्या आजारपणात डॉक्टरांची आज्ञा असून सुद्धा मांसाचे सूप घेण्याचे नाही म्हटले होते. त्यापेक्षा तर खुशीने मृत्यूच्या स्वाधीन होण्याची तयारी दाखविली होती. त्यामुळे गांधीजींचा आत्मा खूपच प्रसन्न झाला होता, आणि स्वतःच्या प्रिय रोग्याच्या शूरपणावर त्यांनी खूप आशीर्वादाचा वर्षाव केला होता.

आजारीपणात सगे-सोयरे धावपळ करीत असतात; पण आजाऱ्याची प्रेमाने सेवा करीत नाहीत. गांधीजींना तर सेवा करण्याची भारी हौस होती. देशातील मोठ्यात-मोठ्या कामाच्या प्रसंगी पण आजारी माणसांची सेवा करण्याचे काम सोडणे, त्यांना पसंत नव्हते. आजारी पडून त्यांच्या देखरेखीखाली सेवा करून घेणाऱ्या बंधु-भगिनी ह्या सद्भाग्यास कधीच विसरू शकल्या नव्हत्या.

देशात फिरता फिरता गांधीजी एकदा उत्कल प्रांतात गेले होते.

उत्कलच्या दरिद्रतेचे काय सांगावे ? जगात गरीब देश आपला हिंदुस्थान आणि हिंदुस्थानात गरिबात-गरीब उत्कल. उत्कलमध्ये माणसे रहात नाहीत पण जणू काही जिवंत

हाडाचे सांपळे राहतात, दुष्काळ त्याची पाठ सोडत नाही. लोकांना दोन्ही वेळेस खाण्यास मिळत नाही, तर मग घालण्यास कपडे कुठून असणार ?

उत्कलच्या अशा गोष्टी गांधीजींनी ऐकल्या होत्या पण नंतर प्रत्यक्षात पाहिल्या.

गांधीजींनी त्या दरिद्री प्रांतातील खेडेगावे पाहिली. खेडेगावे काही अंशी ओस पडली होती. त्यातील झोपड्या पण मोडलेल्या होत्या. झोपडीत माणसे भुकी-तहानलेली आणि निस्तेज होती. बायकांच्या शरीरावर फाटलेले कपडे होते आणि ते पण पूर्णतः शरीर झाकले जाईल असे नव्हते. जेम-तेम करुन कंबर झाकली होती, पण छातीवर काही नव्हते.

गांधीजींना असली दृश्ये पाहून खूपच दु:ख झाले. अरे राम, माझ्या देशात इतकी दरिद्रता? ही दूर करण्यास मी काही करू शकत नाही का ?

त्यांना वाटले की, दरिद्रनारायणाचे खरे दर्शन झाले.

गांधीजींच्या हृदयात दुसऱ्या इतर प्रांतांपेक्षा उत्कल प्रांतासाठी खूपच कोमल भावना होती.

# ३०. पंचा

चंपारण्यातून गुलामी नष्ट करण्यासाठी गांधीजी त्यातल्या खेडेगावात रहात आणि सेवा करीत असत.

ते एका गावात गेले. तेथे त्यांनी खूपशा बायकांना खूप अस्वच्छ पाहिले. गांधीजींनी कस्तुरबांना सूचना दिली की, ह्या बायकांना रोज स्नान करण्यास व स्वच्छ कपडे घालण्यास शिकवा.

कस्तुरबांनी बायकांजवळ जाऊन तशी शिकवण दिली, “स्त्रियांनो ! तुम्हाला कपडे धुवायळा हवेत, असा आळस ठेवू नका.”

अस्वच्छ वस्त्रे परिधान करणाऱ्या बायका त्यांच्या समोर पहात राहिल्या. नंतर त्यांच्यातील एका स्त्रीने सांगितले, “आई, माझ्या झोपडीत ये आणि बघ.”

झोपडीत घेऊन गेल्यावर तिने “बा” ला सांगितले आई, माझ्या झोपडीत बघ. येथे कपड्यांच्या पेट्या की कपाटे भरलेली आहेत ? माझ्याजवळ हे एक पातळ आहे. आता सांग, आई, काय भिजवू? आणि काय नेसू? म्हणून महात्माजींना सांगून मला दुसरे एखादे पातळ द्यायला सांग. म्हणजे मी रोज धुतलेले नेसून स्वच्छ राहीन.

गांधीजींनी देशातील गरिबी पाहिली होती, पण हे ऐकल्यावर त्यांना खरोखर कल्पना आली.

ही दरिद्रता कशी दूर होणार ? त्या बाईच्या मागण्या प्रमाणे तिला दुसरे पातळ देऊन काय होणार ? तज्ञा तर देशात असंख्य बायका आहेत.

स्वराज्य मिळवणे हाच एक उपाय, गांधीजी जेव्हा स्वराज्यासाठी लढत असत तेव्हा त्यांच्या हृदयात ह्या दरिद्री स्त्रियांची आठवण असे.

तशी चळवळ गांधीजींची होती. ती रंगात आली होती. एक दिवस चळवळीत एक मोठा प्रसंग घडला. सरकारनी त्यांचे मित्र मौलाना महमदअली यांना पकडले.

ह्या कठीण प्रसंगी गांधीजींना त्या दरिद्री, अस्वच्छ भगिनींची पुन्हा आठवण झाली. त्यांनी त्याचवेळी प्रतिज्ञा केली की, “स्वराज्याचा सूर्य उगे पर्यंत आणि माझ्या भारतमातेचे शरीर झाकळे जाईपर्यंत, मी तीन-तीन कपडे घालणार नाही. लज्जा झाकण्या पुरता पंचा मळा पुरेसा आहे.”

# ३१. डबा घर – डबा आश्रम

बडोद्याचे गायकवाड स्वतःच्या ध्वजावर मुद्रालेख ठेवीत असत. “खोमीर घर – खोगोर तख्त”. मराठा सरदारांना मोठा अभिमान वाटे की, आमच्या घोड्यावर खोगीर रात्र-दिवस कसलेले राही.

तसेच गांधीजींचे घर-आश्रम जे म्हणाल ते रेल्वेगाडीचा तिसऱ्या वर्गाचा डबा झाला होता. स्वतःचा संदेश देशात एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत पसरविण्यासाठी ते फिरत राहत आणि पुष्कळदा त्याप्रमाणे फेऱ्या मारल्या होत्या की, त्यांनी रेल्वेगाडीत जास्त वेळ घालविला की, आश्रमात हे सांगणे कठीण होते. म्हणून गाडीचा डबाच त्यांचे घर आणि गाडीचा डबा त्यांचा आश्रम असे म्हणण्यात काय खोटे आहे ?

आणि गांधीजी गाडीच्या डब्याला घर समजूनच त्यात स्वतःची सर्व कामे चालू ठेवीत होते. डब्यात सूतकताई, सकाळ - संध्याकाळ प्रार्थना करीत. डब्यात पत्र-व्यवहार चालवत असत, डब्यात भेटी देत वगेरे.

गांधीजी नेहमी तिसऱ्या वर्गाच्या डब्यातूनच प्रवास करीत असत. शरीराच्या अशक्तपणामुळे कधीतरी ते वरच्या वर्गात बसत, पण ते करीत असता त्यांना खूप दुःख होई. ''ज्या जनतेचा मी सेवक आहे. ते तिसऱ्या वर्गांत त्रास सहन करतात आणि त्यांच्यापासून मी वेगळा उंच गादीवर बसणार ?” असे विचार त्यांच्या आत्म्यास चैन पडू देत नसत.

तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांची हैराणगती तर आपल्या देशात जगजाहीर आहे. लोकांच्या बरोबर ते हैराणगतीचा अनुभव घेत तेव्हा त्यांना संतोष होत असे. जेव्हा ते महात्मा म्हणून देशात प्रसिद्ध झाले नव्हते तेव्हा, अशा हैराणगतीचा स्वाद चाखण्याची संधी त्यांना खूप मिळत असे. त्यांना खूपवेळा उभे रहावे लागत असे आणि कधी कधी तर धक्के पण खावे लागत, तर मग झोपण्याची अथवा काम करण्याची व्यवस्था त्यावेळी कशी असणार ?

पूर्वी देशातील पुढारी पण प्रजेपासून दूर-दूर राहत असत आणि कंगाल, अस्वच्छ प्रजेबरोबर रहाण्यास लाज अनुभवीत. ते मोठ्या अंमलदाराप्रमाणेच वरच्या वर्गातच प्रवास करीत, त्यावेळी गांधीजीसारखे बॅरिस्टर आणि दक्षिण-आफ्रिकेत राहणारे सद्गृहस्थ तिसऱ्या वर्गाचा प्रवास करतात ही खूप आश्चर्याची गोष्ट समजली जात होती.

एकदा गांधीजी कलकत्यात गोखल्यांच्या घरी राहिले होते. तेथून निरोप घेताना गोखलेजी त्यांना स्टेशनपर्यंत पोहचविण्यास निघाले होते. गांधीजींनी नम्रतेने त्यांना त्रास न घेण्याबद्ल विनंती केली होती, पण गोखल्यांनी ऐकले नाही. त्यांनी म्हटले, "तुम्ही दुसऱ्याप्रमाणे जर वरच्या वर्गात प्रवास करणार असता तर मी आलो नसतो, पण तुम्ही तिसऱ्या वर्गात बसणार आहात, म्हणून तर मला निरोप देण्यास यायलाच हवे."

अशा प्रकारे गांधीजींचा आदर करणारे, त्या काळात गोखले सारखे कुणी विरळाच मिळत. बाकी सामान्य लोकांना तर हसूच येईल.

तिसऱ्या वर्गांचा त्रास भोगता भोगता गांधीजींना स्वतःच्या देशाच्या गरीब, तुच्छ प्रजेला पूर्णतः ओळखण्याची संधी मिळाली. प्रजेचा स्वभाव, प्रजेची दुर्बलता, प्रजेच्या सवयी, त्यांची नस नस ते ओळखू शकले होते. प्रजेची नाडी गांधीजींनी जेवढी ओळखली तेवढी, दुसरा कुणी पुढारी क्वचितच ओळखू शकला होता. म्हणूनच गांधीजी देशात खरे वैद्य बनू शकले होते आणि त्यांनी दाखविलेला मार्ग प्रजेला बरोबर लागू पडला होता आणि म्हणूनच गांधीजींवर प्रजेची खूप श्रद्धा होती.

# ३२. जेल-महाल

गांधीजी जेलला फक्त जेल म्हणत नव्हते पण जेल महाल म्हणत होते.

जेलला जे घाबरतात त्यांची तर त्या नावानेच छाती घडघडायला लागते. उंच उंच भिंती, मोठे मोठे दरवाजे, काळे काळे भयानक पहारेदार, बेड्या व खणखणाऱ्या श्रृंखला ! पुन्हा दैत्यासारख्या जात्यावर दळायचे, बैल होऊन रहाट खेचायचा आणि घाणीलाही जुंपायचे, ह्या सगळ्यांवर कडी म्हणजे फौजदाराचा दंडुका !

अशा तुरुंगात एकदा आल्यावर पुन्हा बाहेर येणे नाहीच. काही पहायचे नाही व ऐकायचे नाही.

चोर-लुटारू जेलच्या नावाने थरथर कापत. पण गांधीजींच्या मनात तुरूंग भयानक नव्हता, त्यांना तर तो महाल होता. ते पुष्कळवेळा जेल-महालाचा पाहुणचार घेऊन आले होते आणि शेकडो सत्याग्रहींसाठी त्या महालाचे दरवाजे त्यांनी उघडले होते.

आपण देशसेवा करीत असता तुरूंगात जातो तर तुरूंगाची भीती का ? उलट त्यांना आनंद होत असे.

आपल्याळा तर एकदा जेलमध्ये प्रवेश केल्यावर कसलीच  चिंता नाही. जेवणाची वेळ होताच जेवण हजर, घालण्यास कपडे हवे असल्यास ते तयार, राहण्यासाठी खोली पण हजर. काही काम असले की, चोवीस तास फौजदार हजरच ! आपले रक्षण करण्यासाठी पहारेदार उभ्या पायानी पहारा देणार !

शिवाय दिवसा खूप मेहनत करीत म्हणून रात्री छान झोप येई.

असे सुख तर राजाला त्याच्या राजवाड्यात पण नसे. त्याला बिचाऱ्याला चिंतेमुळे जेवण देखील जात नाही. आणि रात्री झोप पण येत नाही.

दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हा गांधीजी त्या देशाच्या तुरुंगाचे पाहुणे झाले होते. हिंदुस्थानांत त्यांनी साबरमती तसेच येरवडयाच्या तुरंगात वेळोवेळी  जाऊन निवास केला होता.

जेलचे नोकर बिचारे त्यांना बंदीगृहात बंदी करीत असताना लाजत असत.

# ३३. तीन प्रतिज्ञा

मोहनदास मोठे झाले.

मावशी दवे म्हणत, ''मोहनदासाला विलायतेला पाठवून बॅरिस्टर केले तर तो त्याच्या वडिलांची गादी संभाळू शकेल.”

विलायतेला जाणे सोपे नव्हते. वडील दिवाण पदावर होते पण पैसे ठेवून गेले नव्हते. राज्यात मदत मिळविण्याचा प्रयत्न करुन पाहिला, पण त्यात निराशा झाली. तरीपण मोठा भाऊ उदार होता. त्याने काहीही करून रुपये एकत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली होती.

पण विलायतेला जाण्यात एक दुसरे विघ्न होते. दर्यापलीकडे गेल्यावर धर्माचे काय ? अन् समाजात काय उत्तर देणार ?

आई पुतळीबाई म्हणाली, ''नाही, नाही, तेथे गेल्यावर पोर वाटून जाईल, दारू पिईल, मांस खाईल, आणि अनीती आचरेल, आपण विलायतेला जाणे योग्य नव्हे.”

“पण त्याला प्रतिज्ञा घेण्यास सांगितल्या तर? मग काही हरकत आहे का? “एका परिचित साधूने मार्ग सुचविला.

आई म्हणाली, “नाही. तर मग हरकत नाही. ” साधू मोहनदासला म्हणाले, “आई समोर तीन प्रतिज्ञा घेतल्या तर परवानगी मिळेल.”

“कसल्या प्रतिज्ञा?”

“पहिली प्रतिज्ञा म्हणजे की दारू प्यायची नाही, दुसरी प्रतिज्ञा की, मांस खायेच नाही आणि तिसरी प्रतिज्ञा की, परस्त्रीला आई-बहीण मानावे. सांगा, ह्या तीन प्रतिज्ञा घ्याल ?”

“हो, खूपच आनंदाने,”

“आई, तुझ्या पायाला स्पर्श करुन प्रतिज्ञा घेतो की, मी दारू घेणार नाही, मास खाणार नाही, परस्त्रीला आई-बहीण मानीन.”

गांधीजींच्या जीवनात प्रतिज्ञा अथवा नियम महत्त्वाचे होते. प्रतिज्ञा मनुष्याचा आत्म-विश्वास आहे आणि तोच त्याला कमजोरी च्या वेळी तारू शकतो.

अशी श्रद्धा त्यांना थेट बालपणापासून होती.

# ३४. मजूर बॅरिस्टर

विलायतेला जाऊन बॅरिस्टर झाल्यावर गांधीजी नोकरीसाठी दक्षिण आफ्रिकेला गेले, एका परिचित मुसलमान व्यापाऱ्याचा नोकर म्हणून ते गेले होते.

कोणाला माहीत की त्याच्या हातून त्या अपरिचित देशात काही वेगळीच कमाई होणार होती.

आफ्रिकेच्या भूमीवर पाय ठेवला तेव्हापासून त्यांना एक प्रकारे गुदमरायला होत होते. हिंदूलोक पावलो-पावली अपमान सहन करीत होत. लहान-मोठे सर्व सारख्याच अपमानास पात्र होते.

खूपशे हिंदू लोक मजूर अथवा “कुली” म्हणून तेथे गेले होते, म्हणून गोरे लोक सर्व हिंदी लोकांना तुच्छतेने मजूर म्हणत. ''व्यापारी, 'मजूर व्यापारी' आणि वकील “मजूर वकील' म्हटले जात. गांधीजी पण 'मजूर' बॅरिस्टर म्हणून ओळखले जात.

गोरे लोक हिंदी लोकांना अशा प्रकारे हलके मानीत असत आणि त्यांच्या बरोबर मिसळण्यास अपमान समजत. घोडागाडी, ट्राम, रेल्वेत त्यांच्या बरोबर बसू देत नसत. उपहार गृहात प्रवेश नसे. रस्त्यावर फुटपाथवर मजूर चालत त्याची गोऱ्यांना चीड होती, तर मग कुठल्या समारंभात पाहुणे म्हणून त्यांना कसे बोलविणार ?

शिकलेल्या आणि श्रीमंत हिंदी लोकांना हे सर्व अपमान परिचित होते. येथे परदेशात मान-अपमान पहायचा नाही, गप्प राहून पैसे कमवावे आणि देशात जाऊन मान मिळवावा, ह्या वाटेने सर्वजण चालत होते.

पण गांधीजींना हे सर्व त्रासदायक वाटले. गेल्यावर लगेच पावलो-पावली अपमान सहन करावा लागला. पण गांधीजी दुसऱ्या हिंदी लोकांप्रमाणे ते सहन न करता, छाती काढून चालू लागले. त्यांना शिव्या, धक्के आणि लाथा मिळाल्या. गांधीजी शिव्याला शिव्या देत नसत,

धक्कयाला धक्का देत नसत, लाथांना लाथा मारत नसत; पण घाबरून अपमान पण सहन करीत नसत.

बॅरिस्टरसहित व्यवसाय करण्यास आले होते. म्हणून त्यांना एक दिवस डरबन शहरातील कोर्ट दाखविण्यास घेऊन गेले.

गांधीजी व्यवस्थिपणे इंग्रजी पोशाक घालत असून सुद्धा डोक्याला हिंदी फेटा बांधण्याचे त्यांनी चालू ठेवले होते. फेटा बांधून ते कचेरीत गेले आणि वकील-मंडळी बरोबर बसले.

न्यायाधीश ह्या नवीन वकिलासमोर पहात राहिला. त्यांच्या मनात आले की, ह्या मजुराने डोक्यावरुन फेटा न उतरविल्याने कोर्टाचा अपमान होत आहे.

थोडा वेळ पाहत राहिल्यावर त्यांनी गांधीजींना फेटा उतरविण्यास सांगितले.

गांधीजी हा अपमान सहन करण्यास तयार नव्हते. फेटा काढण्यापेक्षा शिरच्छेद केलेला चांगला.

त्यांनी फेटा उतरविला नाही आणि ते कोर्ट सोडून निघून गेले.

# ३५. हात पकडून उतरविले

गांधीजी डरबनहून आगगाडीत बसून प्रिटोरियाला जाण्यास निघाले होते. त्यांनी पहिल्या वर्गाचे तिकीट घेतले होते.

घरुन निघताना सर्वांनी सावध केले, "गांधीभाई हा, हिंदुस्थान नाही हे येथे आपल्या लोकांना पहिल्या वर्गात बसू देत नाहीत." पण गांधीजींनी ऐकले नाही. त्यावेळी ते मानीत होते की, त्यांना बॅरिस्टरचा मान राखण्यासाठी पहिल्या वर्गात बसायला हवे.

थोडा प्रवास तर निर्विघ्नपणे झाला. रात्री नऊच्या सुमारास मॅरित्सबर्ग नावाच्या स्टेशनवर गाडी पहोचली. तेथे एक गोरा प्रवाशी त्यांच्या डब्यात बसण्यास आला होता.

पण आरे, हा कोण? हा तर पहिल्या वर्गाच्या डब्यात 'मजूर' चढून बसला आहे !

येणारा गोरा तोंडाने काहीच बोलला नही, पण लगेच बाहेर जाऊन स्टेशनावरील आधिकाऱ्यांना घेऊन आला. अधिकारी पाहत राहिला, कुणाची ही बोलण्याची हिंमत होईना- शेवटी एका अधिकाऱ्याने गांधीजींजवळ जाऊन सांगितले, "स्वामी, जरा इकडे या तर, तुम्हाला शेवटच्या डब्यात जायचे आहे.

गांधीजी म्हणाले, "माझ्या जवळ पहिल्या वर्गाचे तिकीट आहे."

"त्याची काळजी नाही. मी तुम्हाला सांगतो की, तुम्हाळा शेवटच्या डब्यात जायचे आहे."

"मी सांगतो की मला ह्या डब्यात डरबनहून बसविण्यात आले आहे आणि मी त्यातच जाण्याच ठरविले आहे."

उत्तर ऐकून, अंमलदार तर चकित झाला. अरे, एका गोऱ्या अधिकाऱ्यासमोर हा 'मजूर' काय बोलत आहे ? तो रुबाबात बोलला, "हे शक्य होणार नाही. तुम्हाला उतरावेच लागेल आणि नाही उतरला तर शिपाई उतरवेल."

गांधीनी पण दृढतेने सांगितले, तर मग भले, शिपाई उतरवेल. मी स्वत: उतरणार नाही."

तो क्रोधित होऊन शिपायाला बोलावून घेऊन आला. शिपायाने डब्यात चढून गांधीजींचा हात पकडला आणि धक्का मारुन, त्यांना खाली उतरविले. त्यांचे सामान उचलून खाली फेकले.

गांधीजी दुसऱ्या डब्यात गेले नाहीत की त्यांनी सामानास हात देखील लावला नाही. अपमानामुळे त्यांचे रक्त उसळत होते. ते स्वतः प्लॅटफॉर्मवर उभेच राहिले व गाडी तर निघून गेली.

नंतर प्लॅटफॉर्मवरच सबंध रात्र पडून राहिले. थंडी खूपच होती. सामानात ओवरकोट होता, पण फेकून दिलेल्या सामानाकडे पहाण्याचे पण त्यांचे मन होत नव्हते. कदाचित घेण्यास गेले आणि पुन्हां अपमान झाला तर ? त्यापेक्षा थंडीमुळे कुडकुडणे त्यांनी पसंत केले.

थंडीमुळे कापत असता मनात कुठले तरंग उठले.

“गाडीत पुढे जायचे आणि पुन्हा अपमानास आमंत्रण द्यायचे. त्यापेक्षा परत फिरू ?”

“नाही, नाही असे घेतलेले काम अर्धवट सोडता येईल का?”

“अशा देशात कमाईसाठी रहावे त्यापेक्षा हिंदुस्थानात परत निघून जाऊ?”

“नाही, नाही. हे तर मित्राचे काम आहे.” “तेव्हां ह्या गोऱ्या शिपायावर व अंमलदारावर दावा करुन त्यांच्यावर खटले भरावेत ?”

“त्यात काय मिळणार ? त्यामुळे सर्व हिंदी लोकांच्या डोक्यावरील “मजूर”

पणाचा छाप थोडाच कमी होणार ?”

असा विचार करुन गांधीजींनी स्वतःचे मन मारले आणि स्वतःचा झालेला अपमान गिळून टाकला.

## ३६. घोडागाडीची व्यथा

प्रिटोरियाला जातान अजून तर दुसरी व्यथा सहन करण्याचे बाकी होते. चार्ल्सटाऊनपासून जोहान्सबर्ग पर्यंत त्यावेळी रेल्वे नव्हती, पण घोडा-गाडी चालत असे

त्यांनी व्यवस्थित तिकीट काढले होते. ते घेऊन गाडीत बसण्यास जात असता त्या गोऱ्या घोडागाडीवाल्याने थांबवले.

"तुम्हाला नाही बसवणार? तुमचे तिकीट तर कालचे आहे?"

हे तर गांधीजींना अपरिचित समजून निमित्त मात्र होते. खरे पहाता त्याची कल्पना तर अशी की ह्या काळ्या "मजुरास" माझ्या गाडीत गोऱ्या प्रवाशाबरोबर वसविता आले नाही तर चांगले !

असाच उगीच दम कोण चालवेल? शेवटी गोऱ्या लोकांबरोबर गाडीत तर नाही पण बाहेर हाकणाऱ्याजवळ त्याने गांधीजींना जागा करून दिली.

गांधीजी मनात् खूप रागावले, "अशा जागेवर मला बसायचे? आत मध्ये का बसविले नाही?"

परंतु एवढा अपमान मिळाला व बाहेर हाकणाऱ्या जवळ जेथे जागा मिळाली तेथे बसले.

थोडे दूर गेल्यांवर गाडीच्या गोऱ्या माणसाला बाहेर गांधीजी जेथे बसले होते त्या जागेवर बसण्याची इच्छा झाली; त्याला तेथे बसून बिडी ओढायची होती. जरा हवा पण खायची असेल. म्हणून त्याने एक मळकट जुने फडके पडले होते ते त्या हाकणाऱ्याजवळून घेऊन पाय ठेवणाऱ्या फळीवर पसरले आणि गांधीजींना सांगितले, "अरे स्वामी ! तू येथे बस मला हाकणाऱ्या जवळ बसायचे आहे."

ह्या अपमानामुळे गांधीजी क्रोधित झाले. तो पर्वताप्रमाणे मजबूत होता आणि गांधीजी स्वतः अशक्त व त्यात पुन्हा एकटे तरी घाबरून अपमान कसा सहन करणार ?

"तुम्ही मला येथे बसविले तो अपमान मी सहन केला. आता, तुम्हाला बाहेर बसण्याची इच्छा झाली आहे आणि बिडी ओढायची आहे म्हणून तुम्ही मला तुमच्या पायाजवळ बसवता. मी मधे गाडीत जाण्यास तयार आहे, पण मी तुमच्या पायाजवळ बसण्यास तयार नाही."

हे सांगत असताना तर त्या गोऱ्याने त्यांच्या थोबाड्यांत मारल्या आणि दंड पकडून त्यांना खाली ओढू लागला. गांधीजींनी बैठकीजवळच्या सळ्या जोरानी पकडून ठेवल्या होत्या आणि मनात निश्चय केला की, मनगट मोडले तरी सळ्या सोडायच्या नाहीत.

तो शिव्या देत होता, खेचत होता, गांधीजींनी जोरांत सळ्याला पकडले ते उलट बोलले नाहीत, पण त्यांनी जागाही सोडली नाही. शेवटी दुसऱ्या गोऱ्या प्रवाशांनी मधे पडून गाडीवाल्याला दोष दिला आणि गांधीजींना सोडविले.

## ३७. धक्का

प्रिटोरियाला गांधीजी रोज संध्याकाळी घरून निघून खुल्या मैदानात फिरण्यास जात.

रस्त्याच्या बाजूला फूटपाथ होता त्यावरुन ते जात. त्याच रस्त्यावर तेथील अध्यक्ष क्रूगर यांचे घर होते. अगदी साधे घर. बाहेर शिपाई पहारा करीत असे, त्यावरून वाटे की, कोणा राजपुरुषाचे घरअसेल.

रोज ह्या रस्त्यानेच गांधीजी जात. रोज ह्या अध्यक्षाच्या घरावरून ते निघत आणि द्वारपाला समोरुन जात पण आतापर्यंत कुणी बोलले नव्हते.

पण आज द्वारपाल बदललेला असेल. त्याला वाटले “अरे हा काळा “मजूर” फूटपाथवरुन चालतो ? आणि ते पण मोठ्या अध्यक्षाच्या आंगणा समोरच ! त्याची सवय घालवायला हवी.”

तो तर काही बोलला नाही, चालला नाही, नंतर फूटपाथावरुन खाली उतरण्यास पण सांगितले नाही, गांधीजींच्या जवळ जाऊन एकदम जोरात धक्का मारला, लाथ मारली आणि फूटपाथवरुन उतरविले.

ह्या अचानक हल्ल्यामुळे गांधीजी चकित झाले. उभे राहून ते शिपायाचा जबाब घेण्यास जात होते तोच समोरुन येणारा घोडेस्वार म्हणाला, “गांधी, हे सर्व मी पाहिले आहे त्याच्यावर केस करायची असेल तर मी साक्षी देईन.”

हा घोडेस्वार एक गोरा होता. आणि गांधीजींचा मित्र होता.

गांधीजींनी उत्तर दिले, “नाही रे भाई, त्यात केस काय करायची ? हा तर आमच्या दुसऱ्या इतर लोकांप्रमाणे वागत असेल, तसा माझ्याबरोबर वागला.”

मित्र म्हणाला, “नाही, नाही, अशा माणसांना तर धडा शिकवायलाच हवा.”

गांधीजींनी समजाविले, “सर्वच गोरे आम्हाला ‘मजूर’ समजून तिरस्कार करतात त्या ह्या, बिचाऱ्या अज्ञानी शिपायाचा काय दोष ?”

नंतर ह्या गोऱ्या मित्रानीं शिपायाला समजविले तेव्हां त्याने गांधीजींची माफी मागितली.

## ३८. मित्राच्या हाताचा मार

मीर आलम नावाचा एक पठाण दक्षिण आफ्रिकेत रहात होता. गाद्या भरुन विकणे व त्यातून निर्वाह करण्याचा त्याचा व्यवसाय होता.

ह्या मीर आलमला गांधीजींची साधारण ओळख होती. तो काम-काजाच्या वेळी त्यांचा सल्ला घेई आणि त्यांचा आदर करीत असे. गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत सत्याग्रहाची चळवळ उभी कली त्यात हा पठाण रस घेत असे.

आता असे घडले की, सत्याग्रह करीत असता, गांधीजी व दुसरी खूप  हिंदी माणसे बहादुरीने जेल-महालमध्ये गेले. शेवटी सरकारनी नमते घेतले आणि समझोता झाला. कित्येकांना हा समझोता झालेला आवडला नाही. मीर आलमला पण आवडले नाही. गांधीजींचा त्याला राग आला.

त्या देशात एक खूपच वाईट आणि अपमानकारक कायदा झाला होता. आपल्या लोकांनी सर्वांनी सरकारी परवानगी काढायची आणि त्यावर दहा बोटांचे ठसे द्यायचे. ते बरोबर घेऊन फिरायचे.

परवानगी जवळ नसेल त्यांना शिक्षा होई ! असा तो कायदा होता. हिंदी लोकांनी त्या कायद्याविरुद्ध सत्याग्रह केला होता. समझोता असा झाला की, ज्यांना इच्छा असेल त्यांनी परवानगी काढायची आणि ज्यांना काढायची नसेल त्यांना न काढण्याची सूट.

सत्याग्रहाचा विजय झाला सरकारनी गांधीजींना तुरंगातून सोडले. दुसऱ्या सर्व सत्याग्रहींना पण सोडले. नंतर विजय साजरा करण्यासाठी सभा भरली.

सभेत मीर आलमने उभे राहून सांगितले, “ह्यात आपला विजय कसला झाला ? परवानगी काढायची तर राहिलीच ना ?”

गांधीजींनी समजाविले, “ज्यांना काढायची नसेल त्यांना सूट आहे. तुम्ही नका काढू."

"आणि आपण ?"

"मी तर सर्वांत पहिल्यांदा काढून देईन. दहा बोटांचे ठसे पण देईन." "लोकांना संशय आहे की, तुम्ही सरकार जवळून लाच घेतली आहे."

"असे माझ्यासाठी कुणी मानणार नाही."

"ठीक आहे. पण मी ईश्वराची शपथ घेऊन सांगतो की, जो कुणी परवानगी घेण्यास पाहिल्यांदा जाईल त्याला मी ठार करीन."

गांधीजी म्हणाले, "मित्राच्या हाताने मी आनंदाने मरेन पण सत्य सोडणार नाही."

ह्या गोष्टीला तीन महिने झाले. परवानगी काढण्याची तारीख आली. गांधीजी व दुसऱ्या पुढाऱ्यांनी सर्वांत पहिले परवानगी काढण्यास जाण्याचे ठरविले होते.

मीर आलम सभेत घेतलेली शपथ विसरला नव्हता. रागातच तो मनात म्हणाला, "बघतो ते कसे परवानगी काढतात ते !" असे म्हणून दोन-तीन पठाण मित्रांना घेऊन तो रस्त्यात उभा राहिला."

पठाणांनी नमस्कार केला नाही म्हणून गांधीजींनी स्वतःच नमस्कार केला आणि विचारले, "कसे आहात ?" त्याने रागात, डोके हलवून उत्तर दिले. "चांगला आहे."

वेळ होताच घोळका परवानगी काढण्यास निघाला. मीर आलम व त्याचे मित्र पाठोपाठ निघाले. थोडे अंतर दूर राहिले तेव्हा मीर आलम गांधीजींच्या जवळ येऊन म्हणाला, "कुठे निघालात १"

"दहा बोटे देऊन परवानगी काढण्यास. तुम्हांला यायचे असेल तर तुम्ही पण चला. तुम्हांला बोटांचे ठसे द्यायची जरुरी नाही.

असे गांधीजी म्हणाले, तोच पाठीमागून गांधीजींच्या डोक्यावर दांडक्यांचा जोरदार प्रहार झाला. ते पहिल्याच फटक्यात बेशुद्ध होऊन पडले. बेशुद्ध झाल्यावर पण पठाणांनी दांडक्यांचा व काठ्यांचा प्रहार चालूच ठेवला.

गांधीजी बरोबर दुसरे पुढारी होते. ते वाचविण्यास जात असता, त्यांनाही मार बसला.

मारून पठाण पळून गेले पण रस्त्याने जाणाऱ्यांनी त्यांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले.

बेशुद्ध स्तिथीतच लोकांनी गांधीजींना उचलून शेजारच्या घरात नेऊन झोपविले व त्यांच्यावर उपचार केले. त्यांचा ओठ चिरला गेला होता, दांताना इजा झाली होती आणि बरगड्यामध्ये दुखत होते.

थोड्यावेळानी शुद्धीवर आल्यावर गांधीजींनी पहिला प्रश्न काय विचारले असेल ?

“मीर आलम कुठे आहे?”

उपचार करणाऱ्यांनी सांगितले की, तुम्ही आता आराम करा. त्याला अन् त्याचा मित्रांना पोलिसांनी पकडले आहे.

“नाही, नाही ह्या लोकांना लगेच सोडवायला हवे.” असे म्हणून त्यांनी पोलिसांच्या वरिष्ठास पत्र लिहून कळविले की, ह्या पठाण मित्रांना शिक्षा व्हावी असे मी इच्छित नाही, त्यांना सोडावे अशी माझी विनंती आहे.

ह्या पत्राचा मान ठेवून पोलिसांनी मीर आलम व त्याच्या मित्रांना सोडले, पण पाठीमागून गोऱ्या लोकांनी टीका केल्यामुळे पोलिसांनी त्यांना पुन्हा पकडले आणि सहा महिन्याची शिक्षा करवली.

ह्या माराच्या परिणामामुळे गांधीजींचे पुढचे दांत गेले. तो खड्डा त्यांच्या चेहऱ्याचा सुंदर अलंकार आहे. तो सत्याचे पालन करीत असता मिळाला आहे, मित्राने दिलेला आहे आणि प्रेमाने झेललेला आहे.

## ३९. मीर आलम भक्त झाला

ह्या कथेचा खरा भाग तर ह्यापुढेच येत आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने स्वतःचे वचन पाळले नाही म्हणून गांधीजींनी पुन्हा चळवळ सुरू केली.

लोकांना सूचना दिली की, सरकारने धोका दिला आहे. सर्वांना पुन्हा सत्याग्रह करायचा होता. सर्वांनी खूप आनंदाने पखानगी काढली होती. ते करून त्यांची होळी करायची होती. म्हणून ज्यांना चळवळीत एकत्र व्हायचे होते, त्यांना स्वतःच्या परवानग्या पाठवायच्या होत्या.

लोक वेडे झाले. गांधीजींच्या समोर परवानग्यांचा वर्षाव झाला.

होळी करण्याचा दिवस नक्की झाला. त्या दिवशी मोठी सभा भरली व सभेमधे परवानग्यांचा ढीग झाला.

गांधीजींनी विचारले, “बोला, बंधूनो, सर्वांनी अगदी खुशीने परवानग्या जाळण्यास दिल्या आहेत ना?"

“होय, अगदी खुशीने दिल्या आहेत?" “अजून कुणाला परत घ्यायच्या असतील तर सांगा.” “नाही, नाही, आम्हाला, परत घ्यायच्या नाहीत.”

“बधा हं, चळवळ सोपी नाही. तुरंगात जावे लागेल.”

काही फिकीर नाही. होळी करा.”

इतक्यात एक पठाण सभेत उभा राहिला.

“गांधीभाई, ध्या ही माझी परवानगीपण जाळा, माझ्या अपराधा बद्दल मला माफ करा. मी आपल्याला ओळखले नव्हते. आपण खरोखर शूर आहात.”

गांधीजींनी त्याचा हात जोरात दाबला. सबंध सभा टाळ्यांच्या गडगडाटांनी गाजत राहिली आणि गांधीजींनी घासलेट ओतून परवानग्यांची होळी केली.

तेव्हांपासून मीर आलम गांधीजींचा भक्त झाला. आणि गांधीजींची इच्छा नसून त्यांचा अंगरक्षक म्हणून बरोबर रहावयास लागला.

## ४०. भयंकर तुफान

गांधीजी थोडे दिवस देशात राहून परत दक्षिण आफ्रिकेला जाण्यास आगबोटीत बसले. ही त्यांची सफर दुसऱ्यादा होती. कस्तुरबा व मुळांना ह्यावेळी बरोबर घेतले होते. रस्त्यात समुद्रात तुफान सुरु झाले. प्रवाशांच्या पोटात अन्न पण राहत नव्हते. ते घाबरले तरीही खुश होते. त्यावेळी गांधीजींनी सर्वांची सेवा केली व धैर्य दिले पण खरे तुफान तर डरबनला होणार होते.

डरबनच्या गोऱ्यांना बातमी मिळाली होती की, गांधीजी, पुन्हा येत आहेत. ते म्हणू लागले, “पुन्हा हा आमच्या देशात येत आहे? त्यानीच हिंदुस्थानमध्ये जाऊन आमची बदनामी केली आहे ना? त्या गांधीनेच आमचे नाव सबंध जगात बदनाम केळे ना? बसू, त्याला परतच पाठवा.”

कुणी म्हणाले, “हा गांधीच आपल्याला सुखाने राहू देत नाही आणि प्रत्येक गोष्टीत “मजूर'' लोकांना आपल्या विरुद्ध उत्तेजित करतो. बस त्याला आपल्या किनाऱ्यावर पायच ठेवू द्यायचा नाही.”

दुसरा मोठ्याने म्हणाला, “आणि आता तर तो आपल्या बायको-मुलांना पण बरोबर घेऊन येत आहे. त्याला आपल्या देशात रहायचे आहे. बघूया तो कसा प्रवेश करतो आहे ते?”

तिसरा ओरडला, “अरे, माहिती आहे? तो एकटा येत नाही. दोन आगबोटी भरुन बरोबर मजुरांना पण बरोबर घेऊन येत आहे.”

“पुरे, पुरे, त्याला येऊच देऊ नका.”

“सरकारकडून मनाई हुकूम काढवा.”

“सरकारने जर ऐकले नाही तर आपणच गांधीला उचळून समुद्रात फेकू.”

डरबनच्या गोऱ्यांनी खरे-खोटे खूप ऐकले होते. ते खूपच उत्तेजित झाले होते.

गोऱ्यांच्या क्रोधाची गांधीजींना काहीच कल्पना नव्हती. त्यांची बोट डरबन बंदरात येऊन पोहचली.

बंदरातरील अधिकाऱ्यानी सांगितले की, “दूर रहा दूर रहा. येथे आता उतरण्यास परवानगी नाही, तुमच्या देशात प्लेग चालू आहे. म्हणून तुम्हाला क्वारंटाईन मध्ये रहावे लागेल.”

पण आमच्या बोटीत कुणी आजारी नाही.”

“ते काही नाही. क्वारंटाईनमध्येच राहावे लागेल.”

“किती दिवस?”

“२३ दिवस,”

गांधीजी चकित झाले. बंदरावरीत अधिकारी इतके कडक का वागत आहेत? हळूहळू डरबनच्या गोष्टी कानावर येऊ लागल्या. तसे रहस्य समजू लागले.

कोणी आगबोटीतील प्रवाशांना दम भरू लागले, “अरे, परत जा-नाही तर समुद्रात बुडवून देतील ?

कुणी आगबोटीच्या मालकास दम भरू लागले, “तुझ्या बोटी हिंदुस्थानला परत घेऊन जा. नाही तर फुकट मरशील.” पण धन्य आहे त्यांची की कुणी घाबरले नाही. की, कुणी हलले नाही.

२३ दिवस समुद्राची हवा खात मजेत गेले. क्वारंटाईन सुटले. सर्व हिंमतीने डरबन बंदरात उतरले. गोरे पहातच राहिले.

तेवढ्यात एका अधिकाऱ्याने संदेश पाठविला. “गांधीना सांगा की, दिवसा उतरू नका, नाही तर जिवास धोका आहे.”

पण एका मित्राने विचारले, ''गांधी, तुम्हांला भीती वाटते ?”

“नाही, मला तर कसलीच भीती नाहीं.”

“तर मग चला दिवसाच मी तुमच्या बरोबर आहे. अंधारात जायला आपण काही चोर आहोत ?”

गांधीजींनी कुटुंबास एका गाडीत पाठवून दिले. ते त्या मित्राबरोबर चालत डरबन शहरात दाखल झाले.

रस्त्यावर चालत असताना थोड्या अंतरापर्यंत तर कुणी त्यांना ओळखले नाही. पण नंतर कित्येक गोरी मुळे जात होती, त्यांच्या पाहाण्यात ते आले. त्यांच्या सारखा फेटा बांधणारा ह्या देशात एकटाच म्हणून लगेच ते ओळखले गेले.

त्यांना पाहिले, व मुलांनी ओरडण्यास सुरुवात केली.

“गांधी! गांधी!”

“त्याला मारा-मारा!”

“त्याला पकडा-पकडा!”

पहिल्यांदा आरडा-ओरड केली. त्यानंतर खडे मारू लागले. नंतर त्या मुलांबरोबर मोठी माणसे पण आली.

त्या मित्रानी सांगितले, “आता तर जीव घेऊन पळायला हवे ह. चला. रिक्षात बसून पळू या.”

गांधीजी म्हणाले, “रिक्षात ?” माणसाने हांकणाऱ्या गाडीत बसणे तर मला पसंत नाही.” “अरे मित्रा, पसंत आणि ना पसंत, ह्या ढगांचा घेराव होईल, त्याआधी पळून जायला हवे.”

मित्राने रिक्षा बोलावली, मन मारुन गांधीजी त्यावर चढण्यास जात होते, तोच तो घोळका रिक्षावाल्यावर तुटून पडला.

“खबरदार! त्याला बसविले तर! तुझी रिक्षा तोडून टाकू! तुझे डोके फोडू !

बिचाऱ्या रिक्षावाल्या हबशाचे काय चालणार ?

तो तर “खा” (नाही.) असे त्याच्या भाषेत सांगून जीव घेऊन पळाला.

पुढे गांधीजी व मागे घोळका. असे करता करता घोळका मोठा झाला व गांधीजींचा मागे मोठी मिरवणूक निघाली.

तुफानी घोळक्यामधून एका सशक्त मुलाने पुढाकार घेतला. त्याने गांधीजींच्या मित्राला गांधीजींपासून वेगळे केले.

मग काय विचारावे ? गांधीजींवर शिव्या व दगडांचा वर्षाव झाला. एकाने जवळ जाऊन त्यांचा फेटा उडवून दिला. दुसऱ्या एका मजबूत गोऱ्याने थप्पड व लाथ मारली.

गांधीजींचे आता काय चालणार? ते तर चक्कर येऊन पडणारच होते. तेवढ्यात शेजारच्या घराच्या सळ्या हातात आल्या. त्याचा आधार घेऊन थोडा वेळ थांबले व ते पुढे चालले.

अशा आणीबाणीच्या प्रसंगी तेथून एक शूर गोरी बाई चालली होती. ती डरबनच्या आधिकाऱ्याची बायको होती. गांधीजींना ती ओळखत होती. ती गांधीजींजवळ धावत आली आणि ऊन नव्हते तरी पण छत्री उघडून त्यांच्या डोक्यावर धरून बरोबर चालू लागली. ह्या शूर बाईबद्दलच्या आदरामुळे घोळका जरा दूर राहिला. तरीसुद्धा अजून कुणी कुणी थप्पडीचा स्वाद चाखवून जात होते.

त्या दरम्यान पोलिसाची माणसे येऊन पोहचली. त्यांनी तुफानी घोळक्यास दूर केले आणि गांधीजींच्या इच्छेप्रमाणे डरबनचा प्रसिद्ध व्यापारी आणि गांधीजींचा पारशी मित्र रुस्तमजी यांच्या घरी पोहचविले.

गोऱ्यांचा तुफानी घोळका त्यावेळी तर दूर झाला; पण पुन्हा रात्री पारशी रुस्तमजींच्या घरासमोर हजारो गोरे एकत्र झाले आणि हल्ला करू लागले.

“गांधींना आमच्या ताब्यात द्या, नाहीतर घर जाळू.”

पण रुस्तमजी शेठ घाबरणार नव्हते.

ह्यावेळी डरबनच्या पोलीस अधिकाऱ्यांनी खूपच हुशारीने काम केले. त्याने त्यांच्या विश्वासू अधिकाऱ्यास घरात पाठवून गांधीजींना संदेश पाठविला की, वेश बदलून तुम्ही येथून निघून जा. दुसऱ्या बाजूला स्वत: घोळक्यात जाऊन त्यांना गुंगवत ठेवू लागला.

पारशी रुस्तमजीच्या घराच्या दरवाजामध्ये टेबल ठेवून त्यावर चढून चतुर

अधिकाऱ्याने लोकाना गोष्टींत गुंताविले. तो त्यांना गाणे शिकवू लागला.

चालो गांधीने दइए फांसी !

आंबलिया डाळे –

चालो गांधीने दइए फांसी !

घोळका रंगात येऊन म्हणत होता. अधिकारी स्वतःच्या मनात म्हणत होता. "ओरडा करत रहा. मुलांनो पण दरवाज्याचा ताबा तर माझ्या हातात आहे." बाहेर असा तमाशा चालू होता त्यावेळी घरात गांधीजींना त्या अधिकाऱ्यानी देशी शिपायाचा पोशाख दिला. आवडो न आवडो तरीसुद्धा त्यांनी तो घातला. नंतर घरातून दोघे बाजूच्या वखारीत शिरले. शेवटच्या एका वखारीचे दार उघडले, त्यांतून दोन शिपाई बाहेर निघाले, घोळक्यात शिरले आणि निघून गेले. त्यांच्या समोर कुणाचे लक्ष जाणार ?

लोकांचे मन तर त्या गाण्यात होते.

चालो गांधीने दइए फांसी !

चालो गांधीने दइए फांसी !

आंबलिया डाळे ---

चालो गांधीने दइए फांसी !

गांधीजी निसटून गेल्याची बातमी कळताच लगेच त्या अधिकाऱ्याने डाव बदलला. त्याने त्या घोळक्यास सांगितले, "चला आता फार झाले. आता सर्व घरी जा."

“नाही, गांधीना घेऊन या; गांधीना घेऊन या!”

अधिकारी जरा हसून म्हणाळा, “पण तुमची शिकार निसटली असली तर ?”

“अरे, निसटून कशी जाईल? येथे एवढे सगळे उभे आहेत ना ?”

“मी तुम्हाला सांगतो ना की, शिकार तर तुमच्या हातून निसटून गेला !”

“खोटे, खोटे! आम्ही मानीत नाही.”

“तुमच्या वृद्ध फौजदाराची गोष्ट खरी वाटत नसेल तर घर तपासा, पण दोन-चार माणसांचे पंच असेल तर घरात शिरून देईन.”

लोकांनी पंच पाठवून खात्री केली. त्यांची खात्री झाली की, गांधीजी तर सटकले होते. नंतर हसतमुख फौजदाराने सांगितले, “बघा, तुमच्या पोलिसांचा मान ठेवला नाही. म्हणून पोलीस तुमच्या बरोबर डाव खेळले ! आम्ही तर तुमचे नोकर, कुठल्याही मार्गानी आम्हाला कर्तव्य करायला हवे ना ? आता कृपा करुन जा. पोलिस जिंकले व तुम्ही हरलात ?''

रागावलेले लोक सात मजली हसत निघून गेले. कित्येक दिवस निघून गेले. गांधीजींचा मार बरा झाला दंगा करणारे गोरे थंड पडून काम धंद्यास लागले.

मारणारे गोरे समजत होते की, तो 'मजूर' बॅरिस्टर आपल्याला सोडणार

नाही. केस करील व शिक्षा देईल.

सरकार रोज वाट पहात होते की, गांधी, आज दावा करतील, उद्या तक्रार नोंदवतील.

पण गांधीजींचा मार्ग वेगळा होता. त्यांनी तर मारणाऱ्यांना अपरिचित समजून मनापासून माफी दिली होती.

एक दिवशी तेथील एका मोठ्या अमलदारानी गांधीजींना बोलावून सांगितले, “गांधीजी, तुम्हांला इजा झाली. त्याबद्दल आम्ही खरोखर दिलगीर आहोत. अपराधी गोरे आहेत म्हणून त्यांना

शिक्षा होणार नाही असे समजू नका. सरकारची इच्छा आहे की, तुम्ही मारणाऱ्यांना ओळखून दाखवावे."

गांधीजींनी-शांतपणे उत्तर दिले :

"तुमच्या भावनेबद्दल उपकार मानीत आहे पण मला कुणाबद्दल क्रोध नाही."

"पण तुम्ही अपराध्यांना ओळखाल तर खरे ना?"

"क्वचित, एखाद-दुसऱ्यास ओळखीन, पण त्या बिचाऱ्यांचा काही दोष नव्हता असे मी मानीत आहे."

"असे का म्हणता, गांधीजी? त्या दुष्टांनी तुम्हांला मारले नव्हते का ?"

गांधीजींनी उगीच आड-पडदा न ठेवता त्यांना सांगितले, "तुमच्या सारख्या पुढाऱ्यांनी त्यांना प्रोत्साहान दिले म्हणूनच त्यांनी दंगा केला. म्हणून  खरे गुन्हेगार तर तुम्हीच आहात. त्यांना बिचाऱ्यांना शिक्षा का करू ?"

# ४१. आपल्या पापाचे फळ

गोरे जेव्हा आपल्याला ‘मजूर' म्हणत होते तेव्हां आपल्याला वाईट वाटत होते.

मग जेव्हां आपण हरिजनांना भंगी असे म्हणतो, तेव्हां त्यांना काय वाटत असेल ?

त्यांचा आपण किती तरी अपमान करतो ना ? त्यांना आपण स्पर्श करीत नाही, त्यांना आपल्या गावात राहण्यास बंदी, त्यांना जर गावातून निघायचे असेल तर ओरडा करीत निघायचे!

“दूर रहा, माय-बाप!”

“स्पर्श करू नका, माय-बाप!”

“तुमचे भंगी आहोत. माय-बाप!”

किती भयंकर अपमान !

ते पाण्याशिवाय तळमळत, पण आपल्या विहिरीवर त्यांना पाणी भरण्याचा अधिकार नव्हता.

गावातील सर्व मुले शाळेत शिकत, पण त्यांच्या मुलांना प्रवेश नसे अथवा त्यांना दूर बसविण्यात येई.

रेल्वे गाडीत सर्व बसत पण भंगी येताच “जागा नाही.” असे जोरात ओरडत असत.

मंदिरात सर्व देव-दर्शनास जात; पण त्यांच्यासाठी मंदिराची दारे बंद.

हे काय लहानसे दु:ख आहे ?

ते आपले आंगण स्वच्छ करतात, आपले गाव साफ करतात, आपले कपडे विणून देतात, तरी पण आपल्याला त्याचे काही नाही. ह्या सेवेच्या बदल्यात आपण त्यांना काय देतो ? आपल्या जेवणात उरलेला उष्टा तुकडा !

आपल्या पापांना अंत नाही, मग आपण देश-परदेशांत का तुच्छ ठरणार नाही ? ईश्वराने आपल्याला आपल्या पापाचे फळ दिले आहे. असे गांधीजी मानीत असत. म्हणूनच ते हरिजनांची सेवा करीत होते आणि हरिजनांना स्पर्श करण्यात पाप नाही, पण पुण्य आहे असा उपदेश करीत होते.

## ४२. हरिजन पहिला

एका गावात सभा होती. त्यांत गांधीजीचे भाषण होते.

गांधीजीचे भाषण ऐकण्याची कुणाची इच्छा नसणार ? गावातून वाणी निघाले, ब्राह्मण निघाले, पटेल, रजपूत निघाले, लोहार व सुतार निघाले, तेली आणि चांभार निघाले, अठराही वर्ण निघाले.

भंगीवाड्यातील भंगी म्हणाळे, अरे चला, आपण पण सभेला जाऊया. आपले बापूजी येणार आहेत. त्यांच्या सभेला न जाऊन कसे चालेल ?

ते पण सभेला गेले.

सभावाल्यांनी भंग्यांना ओळखले, “अरे, हे तर भंगी आहेत ! अरे, येथे नाही, येथे नाही ! परत जा, परत ! सभेत तुमचे काय काम ?” सभेत बिचाऱ्यांचे काहीही काम नाही.

“माय, बाप, आम्हाला बसवा ना ! बापूजी, तर आमचे पण आहित ना ?”

कुणाला तरी दया आली, नंतर सभावाल्याना समजवून भंग्यांसाठी थोडी  दूर जागा केली. “बसा येथे; पण बघा ह, जवळ येऊन कुणाला शिवू नका.”

“नाही, माय-बाप, जवळ नाही येणार.”

सभा चिक्कार भरली. वेळ होताच, गांधीजींचे सभेत आगमन झाले. ‘वंदे मातरम्’ महात्मा गांधीकी जय! “अशा जयघोषाने सभा गाजली. दूर बसलेल्या हरिजनांनी पण जय-जयकार केला, आणि वर डोके करुन बापूजींना पाहू लागले.

गांधीजी तर आले तसेच मंचावर भाषण करण्यास चढले. क्षणभर चारी-बाजूंना नजर फिरविली. ती तर गांधीजींची बारीक नजर ! दूर हरिजनांचा घोळका बसला होता. ते त्यांनी लगेच ओळखले.

गाववाल्यांना बोलावून विचारले, “ते का दूर बसले आहेत ?”

“महात्माजी, ते तर हरिजन आहेत.”

“त्यांना सर्वांबरोबर बसवा तर!”

गाववाले डोके खाजवू लागले.

“त्यांना सभेत घेतले नाही तर, मी त्यांच्या मधे जाऊन भाषण करीन.”

असे म्हणून गांधीजी सभात्याग करुन स्वत:च्या प्रिय हरिजनांबरोबर एकत्र झाले. गावातील कित्येक धाडशी पुरुषपण त्यांच्याबरोबर गेले. हरिजन बांधवांचा आनंद तर गगनात मावेना. त्यांनी आशीर्वादाचा वर्षाव केला.

“खूप जगोत. आमचे बापूजी खूप जगोत आमचे बापूजी!”

# ४३. आश्रमात हरिजन

गांधीजींनी साबरमतीच्या किनाऱ्यावर आश्रमाची स्थापना केली. तेव्हा जाहीर केले होते की, कोणी योग्य हरिजन आलाच तर त्याला आश्रमात प्रवेश देऊ.

लोकांनी विचार केला की, हे तर असे सांगतात, पण हरिजन कुठे त्यांच्या आश्रमात येण्यास रिकामा असणार ? असे म्हणून ऐकून न ऐकण्यासारखे केले. व गांधीजींच्या आश्रमात ते मदत करीत राहिले, आश्रमाचा खर्च कसा चालत आहे. ह्याची गांधीजींना चिंता राहू दिली नाही.

असे थोडे दिवस गेले तोच खरोखर एक हरिजन-कुटुंब तेथे आले. पती, पत्नी व त्यांचे तान्हे मूल, शिवाय ते ठक्कर बापाच्या ओळखीमुळेच आले होते.

गांधीजींनी विचार केला, ईश्वरानी त्यांना आमची परीक्षा घेण्यासाठी पाठविले आहे. येणाऱ्या हरिजन बंधूला त्यांनी विचारले, आश्रमातील नियम माहिती आहित ना ?

"होय"

"तुम्ही पालन करू शकाल?"

"होय"

"तर मग आनंदाने या आश्रमाला स्वतःचे घर बनवा."

अशा प्रकारे हरिजन कुटुंब आश्रमवासी झाले. सर्वांबरोबर राहत. सर्वांबरोबर काम करीत, सर्वांबरोबर भोजन घेत.

आश्रमात काही सर्वच समजूतदार नव्हते. खूप-जण तर खाली वर झाले, पण गांधीजींनी त्यांना सांगितले :

"मला तर हे हरिजन पाहिजेत. ज्यांना ह्या धर्माचे पालन करायचे नसेल त्यांनी आनंदाने आश्रमाचा त्याग करावा. मग तो माझा पुत्र असो या माझी पत्नी असो."

गावात पण बातमी पसरली की, गांधीजींच्या आश्रमात तर हरिजनाला ठेवले आहे.

“अरे, ह्यांनी तर सांगितले तसेच केले अशा भ्रष्टाचारात आम्ही कुठून मदत केली. “असे म्हणून सनातनी शेटजींनी आपली मदत बंद केली.

मगनलाल गांधी आश्रमाची व्यवस्था सांभाळीत त्यांनी गंभीर चेहरा करून सांगितले, “बापूजी धान्याची कोठारे रिकामी झाली आहेत. येत्या महिन्यात काय करायचे ?”

गांधीजींनी धैर्य दिले, ''ईश्वरावर विश्वास ठेवा. खर्च संपेल तेव्हा हरिजन वाडीत जाऊन राहू आणि मजुरी करून पोट भरू या. पण सत्याला सोडायचे नाही.”

# ४४. दोन ऐतिहासिक कूच

सत्याग्रहाच्या स्वतःच्या चळवळीत गांधीजी कधीकधी 'कूच' चा कार्यक्रम ठेवत होते. तसे एक कूच दक्षिण-आफ्रिकेत त्यांनी केले होते, आणि दुसरे हिंदुस्थानात 'दांडीकूच' ह्या नावाने प्रसिद्ध झाले.

दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहामध्ये जेव्हा सरकारने मर्यादा ओलांडली तेव्हां गांधीजींनी तीन पाऊंडाच्या कराविरुद्ध युद्ध पुकारले आणि हजारो मजुरांना चळवळीत सामील होण्यास सांगितले. बघता, बघता मजूर शेती आणि कारखाने सोडून येऊ लागले.

गांधीजी विचार करू लागले की ह्या सर्वांना पकडणे सरकारला भाग पडेल असा सत्याग्रह कोणता ?

त्यांना कुणी न केलेली कल्पना सुचली. ह्या विशाल घोळक्यास घेऊन पायी कूच करावे आणि परवानगी शिवाय ट्रान्सवालच्या हद्दीत जाऊन परवानगीच्या न्यायाचा भंग करावा.

त्याप्रमाणे त्यांनी कूच केले. घोळका २२११ माणसांचा बनलेला होता. त्यांत १२७ स्त्रिया होत्या. मजुरांनी आपल्या मुलांना पण बरोबर घेतले होते. आवश्यक सामानांची गाठोडी पण घेतली होती.

त्यांनी हद्द ओलांडून कायद्याचा भंग केला, पण कोणीच पकडले नाही. रात्री मुकाम केला तेथे त्या संघाला झोपेत ठेवून पोलिस गांधीजीना एकट्यालाच पकडून घेऊन गेले.

सकाळी संघाला समजले, त्यांचा 'कूच' मधे रस वाढला. दुसऱ्या दिवशी गांधीजी जामिनावर सुटून आपल्या सैन्यांत आल्यामुळे खूपच उत्साह वाढला.

दुसऱ्या दिवशी गांधीजींना पुन्हा पकडले, पुन्हा जामिनावर सोडले आणि ते टोळीत येऊन मिळाले सर्वांना आनंद झाला.

घोळका दूर दूर मजल करीत होता. रस्त्यात एक मुल आजारी होऊन मरण पावले, दुःख झाले, तरी पण, कूच तर पुढे चालूच लागले.

मुकाम असे तेथे तंबूची, जेवणा-खाण्याची, साफ-सफाईची धांदल असे. मुकामांतील हिंदी व्यापारी प्रेमाने जेवणाच्या शिध्याची व्यवस्था करीत.

शेवटी तिसऱ्यांदा गांधीजींना पकडले. त्यांवेळी त्यांना जामिनावर न सोडता शिक्षा झाल्यावर जेलमध्ये रवाना केले.

पुढच्या मुक्कामात टोळक्याला पकडून दोन स्पेसल आगगाड्यांत बसविले.

'दांडीकूच' ची कथा तर कुणाला माहिती नाही? गांधीजींनी पूर्ण स्वराज्याची चळवळ करण्याचा निश्चय केला. तेव्हा तुरुंगाचे दरवाजे उघडण्यासाठी कुठला कायदेभंग करावा ह्याचा त्यांनी शोध केला. शेवटी त्यांनी मिठाचा कायदा पसंत केला.

त्यासाठी दांडीकुचचा कार्यक्रम त्यांनी योजला. गांधीजींनी भीष्म-प्रतिज्ञा घेतली, "रणा-रणांतून भटकेन, कावळ्या कुत्र्याच्या हाती मरेन, पण स्वराज्य घेतल्या शिवाय आश्रमात परत पाय ठेवणार नाही." प्रतिज्ञा घेऊन ते निघाले.

साबरमती आश्रमातून निघून, सर्व गुजरात फिरुन, गुजरातच्या दुसऱ्या टोकास असलेल्या दांडीच्या समुद्रावर पोंहचायचे आणि पहिल्यांदा स्वतः मीठ तयार करुन कायदेभंग करावा असे ठरले होते.

आश्रमांतील ८० जोडीदारांबरोबर कूच करण्यात आले. रोज दुपारी व राजी रस्त्यात येणाऱ्या गावात मुक्काम होई, तेथे खाण्यापिण्याचे होई, चरखा, टकळी कताई होई व लोकांना गांधीजी चळवळीचा संदेश ऐकवीत. दांडीकूच च्या दर्शनास हजारोच्या संख्येने लोक जमत असत.

लोक रोज पकडण्याची वाट पहात पण सरकारनी कूच पूर्ण होऊ दिले. शेवटी गांधीजींनी दांडीच्या सुंदर समुद्रात स्नान करून समुद्राच्या पाण्यामधून मीठ तयार केले.

नंतर तर सबंध देशात मिठाची लुटा-लूट चालू होती.

सरकारने अशी नीति ठेवली की, गांधीजींना पकडायेच नाही; पण देशात दुसऱ्यांवर अत्याचार करायचे. अत्याचारांत स्त्रियांवर लाठ्यांच्या प्रहारांच्या गोष्टी येत असत. गांधीजी चिडत होते. “काठीचा प्रहर माझ्या डोक्यावर व्हायला पाहिजे. त्याच्या साठी आता मी काय करू ?

शेवटी त्यांनी धरासणचे अगर लुटण्याचा निश्चय केला, पण कूच सुरू करण्याच्या आदल्या रात्री त्यांच्या संघाला झोपेत ठेवून पोलिस गांधीजींना घेऊन गेले.

# ४५. राष्ट्रीय उपवास

पंजाबमध्ये मातृभूमीचा भयंकर अपमान झाला होता. अपमानमुळे सर्वाचे हृदय जळत होते. सर्व देशात सत्याग्रह करण्याचा निश्चय झाला होता.

पण ह्या मोठ्या कार्याचा आरंभ कसा करणार? “गावा-गावातून आणि शहरा-शहरांतून सभा भरा” हें करण्या सारखे खरे, पण गांधीजींना तेवढ्यांनी संतोष होणार नाही.

“गावा-गावातून आणि शहरा-शहरांतून संप करा. “ह्यात एक पाऊल पुढे उचलले खरे, पण अजून गांधीजी काही अधिक अपेक्षा करीत होते.

शेवटी सुचले, सबंध देहा एकाच दिवशी चोवीस तासांचा उपवास करील.

ते साल १९२१ चे होते आणि तारीख एप्रिल १३ची होती. गांधीजींचा संदेश पसरला होता.

देशाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकार्यंत उपवास व प्रार्थना ठेवण्यात आल्या. ह्या एका दिवशी ह्या विशाल देशात, तीस कोटी माणसे, नव्हती पण तीस कोटी डोक्याच्या आणि साठ कोटी हात व साठ कोटी पायाचा एकच पुरुष होता.

हा राष्ट्रीय उपवासाचा दिवस अमर राहिला.

# ४६. प्रेमाचे उपवास

सर्व विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना माहिती होते की, कुणालाही मारायचे नाही असे गांधीजी शिकवत होते.

म्हणून त्याच्या राष्ट्रीय-शाळेत विद्यार्थ्यांना माराची जरा पण भीती नव्हती. कोणी शिक्षक मारण्यास जाई, तर विद्यार्थी उभा राहून विचारू शके की, बापूजी, मारण्यास नाही म्हणातात आणि तुम्ही का मारता ?

गांधीजी, कुठल्याही मुलाची चूक झाली तर त्याला मारीत नसत. दोष देऊन त्याचा अपमान पण करीत नसत; पण खूपदा मुले अपराध करीत तेव्हा ते स्वतः उपवास करीत असत.

अशा प्रकारे एकादा त्यांनी आठवड्याचे उपवास केले होते. ते म्हणत असत, मुलांनी चूक केली त्यात त्यांच्यावर मी क्रोध कसा करणार ? माझ्या स्वत:मध्ये दोष राहिळा असेल, म्हणूनच त्याला वाईट काम करण्याचा विचार झाला. जर मी पवित्र असेन, तर माझ्या जवळ राहणारे मूल वाईट कसे होऊ शकेल ? जर मी खरी अहिंसा पाळत असेन तर मूल मला घाबरून, आपला अपराध लपविणारच नाही.

असा विचार करुन गांधीजी स्वतः उपवास करीत होते.

अशा प्रेमाने कुठले मूल वश झाल्याशिवाय राहू शकेल ?

## ४७. मोठा उपवास

हिंदू आणि मुसलमानांना गांधीजींनी खूपच विनविले, पण ते भांडल्याशिवाय राहिलेच नाहीत.

आपण एकाच देशाची मुले, आपण भांडता कामा नये, तरी पण भांडणे संपत नव्हती,

“आपले पूर्वज कसे एकजुटीने राहत असत त्याचा विचार करा.”

तरी पण भांडणे चालूच.

“भांडण्यात एकाचे पण संस्कार दिसत नाहीत म्हणून एक व्हा.''

पण भांडणाच्या आनंदात संस्काराचा विचार कुणाळा असणार ?

“एक झाल्याशिवाय स्वराज्य मिळणार नाही.” पण क्रोध उतरला तर स्वराज्याची गोष्ट ऐकतील ना? “दोघांच्या लढाईत तिसऱ्याचा फायदा होईल हे डोळ्यासमोर ठेवा.”

पण डोळ्यांत जर क्रोध, वैर असेल तर डोळे कसे उघडणार ?

शेवटी बोलून बोलून थकले तेव्हा गांधीजींनी काय केले? त्यांनी २१ दिवसाच्या उपवासाचे कठीण व्रत घेतले.

दिल्लीत अनसारी साहेबांचे घर आणि त्यात गांधीजींचा उपवास ! गांधीजी हसत हसत भुकेची दु:खे सहन करीत आणि अनसारीजी भावुक होऊन त्यांची सेवा करीत.

# ४८. स्वराज्य

हिंदचे आजोबा दादाभाई नवरोजजी यांनी स्वराज्याचा मंत्र शोधला.

लोकमान्य टिळकांनी तो घरो-घरी पोंहचविला. गांधीजींनी स्वराज्यासाठी घरा-घरातून यज्ञ चालू केले.

हिंदच्या आजोबांनी पुस्तके पालथी घातली व शोधले की, मोठ्यात मोठा रोग भुकेचा आहे.

लोकमान्य टिळकांनी सहा वर्षांचा तुरुंगवास सहन करून शिकविले की, भूक स्वराज्यानेच भागू शकेल.

गांधीजींनी स्वतःच्या तपश्चर्येने पुढचा धडा आपणास दिला.

"देशाचा रोग स्वराज्यानेच नष्ट होईल आणि स्वराज्य खादीनेच मिळेल."

ह्या स्वराज्याची चळवळ मोठे योद्धेच लढू शकतील असे मानू नका. मूल पण त्यात सैनिक होऊ शकते. जर तुम्हाला प्रवेश ध्यायचा असेल तर एवढे करा व प्रवेश ध्या.

विदेशी कपड्यांचा त्याग करा आणि शुद्ध खादी धारण करा.

देशासाठी रोज कताई करा. गुलामीचे पोषण होईल असे शिक्षण घेऊ नका. देशभक्तीला शोभेल असे शिक्षण घ्या.

मातृभाषा व राष्ट्रभाषा नीट शिका. इंग्रजीरूपी परक्या आईच्या दुधावर आधार ठेवू नका.

हिंदुस्थान म्हणजे आपली लाखो दरिद्रीखेडी म्हणून खेडेगावांवर प्रेम असू द्या. खेडेगावांत राहण्याचे ठेवा. खेड्यांतील माळ वापरण्याचा अभिमान बाळगा.

हरिजनांच्या मुलांना तुमच्या जवळ प्रेमाने बसून शिक्षण घेऊ द्या. आपल्याला स्वराज्याचा उपभोग ध्यायचा असेल तर सर्वांत प्रथम त्यांना स्वराज्य द्यायला पाहिजे.

## ४९. इंग्रजांना

गांधीजींनी ‘हिंद स्वराज्य’ नावाचे पुस्तक लिहून त्यात स्वराज्याबद्दलची त्यांची कल्पना विस्तृत केली आहे. पुस्तक वाचक आणि अधिपती ह्यांच्या संवादरूपाने लिहण्यात आले आहे.

वाचक विचारत आहे :

“इंग्रजांना तुम्ही काय म्हणाल?”

आपल्याला पण हाच प्रश्न विचारण्याची मनात इच्छा होईल.

अधिपतीच्या रूपाने गांधीजींनी त्या प्रश्नाचे खालील प्रमाणे उत्तर दिले आहे. आपल्याला पण त्या उत्तरांतून गांधीजींचे विचार कळू शकतील.

अधिपती – त्यांना मी विनयपूर्वक सांगेन की, तुम्ही माझे राजा खरे. तुम्ही तुमच्या जोरावर आहात की, माझ्या इच्छेमुळे आहात: ह्या प्रश्नांची चर्चा मला करण्याची जरुरी नाही, तुम्ही माझ्या देशात रहा. त्याबद्दल पण मला द्वेष नाही. पण तुम्हाला, राजा असून पण नोकराप्रमाणे रहावे लागेल तुमचे सांगितलेले आम्हांला नव्हे पण आमचे सांगितलेले तुम्हांला करावे लागेल.

आतापर्यंत तुम्ही ह्या देशातून जे धन घेऊन गेलात, ते तुम्हांला पचेल पण ह्यापुढे तुम्ही तसे कराल ते चालणार नाही.

तुम्ही हिंदुस्थानात शिपाई म्हणून राहणार असाल तर राहू शकाल. तुम्हांला आमच्याबरोबर व्यापारी लोभ सोडावा लागेल.

तुम्ही ज्या सुधारणांचा प्रयत्न करता त्याला आम्हीं कुधारणाच म्हणतो. आमच्या सुधारणांना आम्ही तुमच्यापेक्षा श्रेष्ठ मानीत आहोत. तसे तुम्हांला सुचले तर तुमचा फायदा आहे. तसे तुम्हांला सुचले नाही तरी पण तुम्हाला आमच्या देशात देशी होऊनच राहवयास पाहिजे.

तुमच्या पासून आमच्या धर्माला बाधा होईल असे व्हायला नको. तुमचा धर्म आहे की, तुम्ही राज्यकर्ते असून हिंदूच्यासाठी गाईचे मांस, आणि मुसलमानांच्या साठी डूकाराचे मांस

सोडावे. आम्ही दबलेले होतो म्हणून बोलू शकलो नाही पण आमची भावना दुखावली नाही, असे तुम्हांला म्हणायचे आहे? आम्ही स्वार्थ किंवा दुसऱ्या भीतीमुळे तुम्हांला सांगू शकलो नाही पण आता सांगणे हे आमचे कर्तव्य आहे.

तुम्ही स्थापन केलेली न्यायालये व शाळा काही कामाच्या नाहीत असे आम्ही समजतो. त्याच्या बदल्यात आम्हांला आमची खरी न्यायालये व शाळा हव्या आहेत.

हिंदुस्थानची भाषा इंग्रजी नाही पण हिंदी आहे. ती तुम्हाला शिकावी लागेल आणि आम्ही तर तुमच्या बरोबर व्यवहार आमच्याच भाषेत करू.

तुम्ही रेल्वे व सोजीरासाठी भरपूर पैसे वापरता, ते आम्ही पाहतो. त्याची आम्हांला जरूर वाटत नाही. रशियाची भीती तुम्हाला असेल, आम्हांला नाही. ते येतील तेव्हा, आम्ही पाहून घेऊ. तेव्हा तुम्ही असलात तर आपण बरोबर पाहून घेऊ.

आम्हांला विलायती कापडाची जरूर नाही. ह्या देशात उत्पन्न होणाऱ्या वस्तूंनी आम्ही चालवू शकू. तुमचा एक डोळा मॅन्चेस्टर वर आणि दुसरा आमच्या वर असे चालणार नाही.

तुमचा आणि आमचा एकच हेतू आहे. असे तुम्ही वर्तन ठेवाल तेव्हांच आपली मैत्री राहू शकेल. तुमच्याबरोबर ही गोष्ट तुच्छतेने केली नाही. तुमच्याजवळ शस्त्रबळ आहे. नौकासैन्य भरपूर आहे. त्याबरोबर आम्ही त्याच शक्तीने नाही लढू शकणार. पण जर तुम्हांला वरची गोष्ट कबूल नसेल तर आम्ही तुमच्या बरोबर व्यवहार ठेवणार नाही. तुमची मर्जी असेल व शक्य झाले तर तुम्ही आम्हांला कापून टाका तुमची इच्छा असेल तर तोफांनी उडवा. आम्हांला जे पसंत नाही, ते तुम्ही केले तर, त्यात आम्ही तुम्हांला मदत करणार नाही आणि आमच्या मदतीशिवाय तुम्ही एक पण पाऊल उचलू शकणार नाही.

ही गोष्ट तुम्ही तुमच्या सत्तेच्या अभिमानामुळे हसून काढाल अशी शक्यता आहे. पण तुमचे हसणे व्यर्थ आहे. जर आमच्यात शक्ती असेल तर तुम्ही पहाल की, तुमचा गर्व व्यर्थ आहे. आणि तुमचे हसणे तर विपरीत बुद्धीची खूण आहे.

आम्ही तर मानतो की, तुम्ही धर्म-परक माणसे आहात. आम्ही तर धर्मस्थानातच राहत आहोत. तुम्ही आणि आम्ही कसे एकत्र झालो हे विचारणे व्यर्थ आहे. पण आपल्या संबंधाचा आपण दोघेही चांगला उपयोग करू शकतो. तुम्ही हिंदुस्थानला येणारे इंग्रज, इंग्रजी प्रजेचे खरे नमुने नाहीत; तसेच आम्ही अर्धे इंग्रजांसारखे झालेले हिंदी लोक, पण खऱ्या हिंदी प्रजेचा नमुना म्हणता येणार नाहीं. इंग्रज प्रजा जर सगळे समजेल तर, तुमच्या कार्याचा विरुद्ध होईल. हिंदी प्रजेने पण, तुमच्या बरोबर संबंध थोडाच ठेवळा आहे !

तुम्ही जर तुमची सुधारणा जी कुधारणा आहे तिला सोडून तुमच्या धर्माचे संशोधन कराल तर, तुम्ही पहाल की, आमची मागणी बरोबर आहे. त्याचप्रमाणे तुम्हाला हिंदुस्थानात राहता येईल.

असे तुम्ही राहिलात तर तुमच्या पासून आम्हांला खूप काही शिकायचे आहे, ते शिकू आणि आमच्यापासून तुम्हांला खूप काही शिकायेच आहे, ते तुम्ही शिकाल. असे करता करता आपण परस्परांचा फायदा करून घेऊया. व जगाचा फायदा करू या. पण ते तर आपल्या संबंधाचे मूळ धर्मक्षेत्रात ठेवू तेव्हांच शक्य होईल.

## ५०. प्रेम

आपणा सर्वांना गांधीजींवर खूपच प्रेम का आहे ? ह्याचे कारण हे आहे की, त्यांच्या हृदयात आपल्या साठी प्रेम उचंबळत होते. गांधीजींबद्दल कुणाला वैर नाही ह्याचे कारण माहीत आहे का?

ह्याचे कारण पण हेच की, त्यांच्या हृदयात कुणाबद्दळ वैर राहत नाही.

गांधीजी सरकारच्या अत्याचारासमोर लढत होते. तरी पण खूप इंग्रज ळोक त्यांच्यावर प्रेम करीत. ह्याचे कारण पण हेच की गांधीजी इंग्रजांवर पण स्वत:च्या मनात प्रेम ठेवीत असत.

एखाद्या माणसाने वाईट काम केले तर, क्रोध करून त्याला मारणे, हे तर पशूचें काम झाले. मनुष्याचे कर्तव्य हे आहे की, मनुष्याला प्रेमाने जवळ घ्यावे आणि प्रेमाने त्याला सहन करावे.

गांधीजी अशारीतीने कुणाबद्दल वैर ठेवीत नसत. म्हणूनच कोणीही त्यांचा शत्रू नव्हता. ते सर्वांवर प्रेमाचा वर्षाव करीत म्हणून त्यांच्याबद्दल आपल्याला प्रेम उत्पन्न होते.

## ५१. गांधीजींची अहिंसा

अहिंसा म्हणजे काय? "कुणाची हिंसा करू नये; कुणाला मारू नये."

मनात क्रोध ठेवला तरी हिंसाच म्हणता येईल. म्हणून तशी मनाची पण हिंसा करू नये, पण मनात प्रेम ठेवावे, ह्याचे नाव खरी अहिंसा.

'पण कुणी जर आपणास मारण्यास आले तर, अहिंसेचे पालन कसे करणार?'

खरे पाहता, तर त्याचवेळी अहिंसेची परीक्षा होते ना ? कोणी आपल्याला मारणार नाही की, आपल्याला क्रोध करू देणार नाही. तेव्हा तर गुरे देखील अहिंसा पाळत असतात !

"परंतु जर मार खात राहिलो तर आपण घाबरट नाही का? आपण घाबरट कसे असणार? आपण मार खाऊन रडत नाही, आपण माराच्या भीतीमुळे पळून पण जात नाही, प्रेमामुळे आपणास क्रोध येत नाही, व मारीत नाहीत त्यात घाबरट कसे होणार ?

"असे जर कुणी मारून गेले तर, त्याच्यावर प्रेम करावे हे तर खूप अवघड. त्यापेक्षा थप्पड मारावी हे सोपे आहे."

खरी गोष्ट, अहिंसेचे पालन करणे. सरळ तर नाहीच. अहिंसा शुराचा मार्ग आहे. घाबरटाचे त्यात काम नाही.

गांधीजींनी अशा अहिंसेचे पालन केले आणि आपणा सर्वांना पालन करण्याचा उपदेश दिला.

## ५२. आत्मबळ

जगात मारणारी माणसे खूप आरडाओरड करीत आहेत.

ह्यांनी मला नमस्कार केला नाही, म्हणून ह्याला मारून टाकू.” इत्यादी.

गांधीजी तर हात करून सांगत भारतीयांनो आरडा-ओरड्यात मिसळू नका. आणि त्यापासून घाबरून दूर पण पळू नका. तुम्ही तर आहिंसेचे पालन च करा. सर्व लढून थकतील तेव्हा, आपणापासून अहिंसा शिकतील.

“अहिंसेचे पालन करण्यास जाल तेव्हा आपल्याला सर्व एकत्र होऊन मारून टाकतील असे भय ठेवू नका. अहिंसेला तुम्ही ओळखत नाहीत, म्हणून भीती वाटत आहे. अहिंसेने तर वैरी पण शांत होत असतो.”

जगातील प्रजेला ह्या उपदेशावर विश्वास बसत नाही.

एक प्रजा लाखो सैन्याचे पोषण करते. दुसरी प्रजा पाच लाख.

तिसरी प्रजा दहा लाख.

एक प्रजा शंभर लष्करी जहाजे बनवीत आहे. दुसरी प्रजा हजार.

तिसरी तर दहा हजार.

ज्यांची विमाने कमी त्यांना झोप येत नाही. आणि रात्रं-दिवस ती वाढविण्याची चिंता असते.

आणि ती फुकट तयार होत नाहीत. कोट्यावधी पौंडाचा धूर करावा लागतो.

आणि पौंड म्हणजे काय ?

पौंड म्हणेज जनतेचा घाम आणि जनतेचे रक्त. गांधीजींनी अहिंसेची शस्त्रे आपल्याला जी शिकविली आहते ती.

सत्याग्रह, असहकार, दुःख सहन करणे ही होत.

हसऱ्या चेहऱ्याने दुःख सहन करणाऱ्या प्रजेला पाहून अन्यायी फिक्का पडत आहे. मारेकऱ्याची पकड सैल होत आहे.

तर मग कुठली शक्ती मोठी? तोफेची की, अहिंसेची? कुठले बळ मोठे? तोफबळ की आत्मबळ?

गांधीजी ऐकलेली की वाचलेली गोष्ट सांगत नाहीत खूप खूप संकटे सहन करून त्यांनी अहिंसेचे रत्न प्राप्त केले होते.

अहिंसेमुळेच भारतवर्षाचा जयजयकार आहे.

## १. गांधीस्तोत्र

अेनुं जीवनकार्य अखंड तपो,

अम वच्चे बापू अमर रहो;

अेना जीवनमंत्र समो चरखो,

प्रभू भारतमां फरतो ज रहो.

अम जीवनमां अम अंतरमां

अेनी उज्ज्वळ ज्योत ज्वलंत रहो.

अम देशना दैत्य ने दुर्बलता

अेनी पावक आतम ज्वाल दहो.

अेनो सत्यनो सूर्य सदाय तपो

अम पाप निराशाना मेल दहो;

अेना प्रेम आहिंसाना पूर प्रभो

अम भारतना क्लेश वहो.

अेणे जीवतां राम सदाय रट्या

अे तो राम वदीने विदाय थया

लघु मानवमा महिमा भरवा

निज लोही अशेष वहावी गया.

— जुगतराम दवे

## २. बापू केरुं नाम

मने वहालुं बापू केरुं नाम छे रे

अेने हृदिये रघुपति राम छे रे. — मने.

पहेरी पोतडी ने आखडीअे चालता रे

वहालो बावा बधाने बनावता रे — मने.

ढेड मेलाघेलाने लेता सोडमां रे.

अेनो आतम रमे रणछोडामां रे — मने.

वहाले बोखी डोशीनी लीधी सार छे रे;

अन्नदाता रुडा रेंटियाना तार छे रे — मने.

दु:ख मोते वेठे ने बीजा हारता रे

वहालो मांडे प्रलहाद केरी वारता रे — मने.

— तनसुख भट्ट

## ३. अमारो देश

जगतना सर्व देशोमां

अमारो देश सारो छे;

भले भूलो करे तोये

अमारो देश सारो छे.

सरस पहाडो अमारे त्यां

सरस नदीओ अमारी छे;

सरस फूलो सदा उगे

अमारो देश सारो छे

पशुपंखी  जुदां जुदां

अमारा देशमां बहुये;

बधी चीजो आहीं पाके

अमारो देश सारो छे.

अमारा देशमां सतीओ,

अमारा  देशमां साधु

अमारा देशमां सौ छे

अमारो देश सारो छे.

प्रभुनो पाड मानीशुं —

अमोने जन्म आहीं दीधो;

सदा गर्वे अमे कहीशुं —

अमारो देश सारो छे.

— डॉ. चंदुलाल

## ४. गांधी गुजराते उतर्या

अेवा गांधी गुजराते उतर्या रे

अेनुं सूकुं शरीर जाणे लाकडी रे

माहे जोरावर छे जीव.

— अेवा गांधी

अेणे घेर घेर रेंटिया मोकल्या रे

लेवा सूतर ने तांतणे स्वराज्य

अेवा गांधी

अेणे सादाई शीखवी देशने रे

चा, दारु कराव्यां दूर

अेवा गांधी

लोक वाट जुअे छे प्रभु आवशे रे

नव जाणे आव्यो आवनार

— अेवा गांधी ०

अेनो धन्य जनम् धन्य जीववुं रे

माताअे उपाड्यो धन्य भार —

अेनो मोंघो आदेश लोको झीलता रे

बोली भारतनो जयजयकार

— गिरीश

## ५. गांधीने शरणे आवो रे

गांधीने शरणे आवो रे अवसर छे छेल्लो

तेना ते गुण तमे गाओ रे —

परदेशी छोडी विलायती छोडी

रेंटियो पकडी लेजो रे —

दारुने छोडी, ताडीने छोडी

दूध ने छाश तमे पीजो रे —

मांसने छोडी, मच्छीने छोडी

गोळ ने रोटलो खाजो रे —

डाकणने छोडी, भूतडांने छोडी

रामनुं नाम तमे लेजो रे —

झेर ने छोडी, वेर ने छोडी

हेत ने प्रीतथी रहेजो रे —

कूडने छोडी कपटने छोडी

सतने रस्ते रहेजो रे.

— अवसर छे छेल्लो

— अज्ञात

* * * * *